...पाल ...

हा ग्रंथ

जिनधर्मानुयायी स्वजात्यभिमानी व देशबंधु यांकरता

पद्यात्मक

# अण्णापा आपा वाडकर

रहाणार दुधगांव,

यांनीं

## नागेश रघुनाथ दीक्षित

स्कूलमास्तर, कामेरी, तालुके वाळवे जिल्हा सातारा

यांच्या मित्रत्वसाह्यानें तयार केला.


नं. १३९ म. ग्रं. सं. ठाणें १३९

| विषय | लेखक | सन |
| --- | --- | --- |
| काव्य | अण्णाप्पा आप्पा वाडकर | १८८३ |

संग्रहालय क्रमांक १०३८ १०३९

पुस्तकाचें नांव श्रीपाल चरित्र

J. H. Vala
Mumbadevi

1002

# श्रीपालचरित्र.

हा ग्रंथ

जिनधर्मानुयायी स्वजात्यभिमानी व देशबंधु यांकरितां

पद्यात्मक

**अण्णापा आपा वाडकर**

रहाणार दुधगांव,

यांनीं

**नागेश रघुनाथ दीक्षित**

स्कूलमास्तर, कामेरी, तालुके वाळवें जिल्हा सातारा

यांच्या मित्रत्वसाह्यानें तयार केला.

मुंबई:

"इंडियन प्रिंटिंग" छापखान्यांत छापिला.

सन १८८३.

या ग्रंथासंबंधी सर्व हक्क मालकाकडे आहेत.

किंमत १२ आणे.

# प्रस्तावना.

अर्लीकडे जिकडे तिकडे ज्ञानजालप्रसरण झाल्यानें कैक श्रेष्ठ-जातीय लोक त्यांत गोंवून गेले आहेत, इतकेंच नव्हे तर एकंदर जातीलाही त्यांतील अल्पस्वल्प तंतु मिळून तदाधारें यथामति स्वदेश-जातबंधुसेवा करीत आहेत.

उत्तम दुग्धाचा परिणाम जसें घृत तसें उत्तम भाषेचा शेवट सुंदर काव्य हें होय. आतां भाषाज्ञानाच्या प्रमाणांत काव्य असणार हें स्पष्टच दिसतें. व त्यांत गुणदोषही त्या मानानेंच व्हावयाचे.

वरील आक्षेप मनांत आणून इष्ट हेतु तडीस जाणें कठीण आहे जाणून किंचित् त्यांकडे दुर्लक्ष करून ही सेवा हातीं धरिली, ती अनेक संकटांतून पार पडून ह्या स्थितीस येऊन ठेपली.

हें 'श्रीपालचरित्र' मूळ मागधी भाषेंत आहे. जसे सध्यां रामविजय, पांडवप्रताप वगैरे मराठींत प्रसिद्ध असलेले ग्रंथ आहेत, त्याप्रमाणेंच जिनधर्मप्रवर्धक नृपतींचा हा चरित्रभाग आहे. तो मूळ भाषेंत फारच मनोरंजक आहे. तद्वत मराठी भाषेंत मजसारख्या अल्पज्ञ मनुष्याच्या हातून मनोरम होणें दुरापस्त, तथापि यथामति शक्त्यनुसार श्रम करून हें तयार केलें आहे. माझ्या देशबंधूंस कितपत प्रिय वाटेल ह्याचा अजमास त्यांच्यावरच अवलंबून आहे.

कवितेसारखें मोठें काम म्यां यःकश्चितानें हातीं धरिलें तें शेवटास जाण्यास कारण माझे प्रियमित्र आहेत. त्याजबद्दल मी जातबंधूचा फार अभारी आहें.

मेहेरबान रावसा० गोपाळ बळवंत नेने डे०ए०इ० जिल्हा सातारा ह्यांच्या आश्रयानें हें काम तडीस नेलें त्याजबद्दल त्यांचे मजवर फार उपकार आहेत.

सरशेवटीं स्वदेशबंधूंस इतकीच प्रार्थना आहे कीं त्यांनीं जातिभेद मनांत न आणितां आपला उदार आश्रय द्यावा—ह्मणजे आणखी वरचेवर त्यांची सेवा करण्यास उमेद येईल.

शेवटीं एक छोटेखानी निबंध जोडला आहे तो सर्वांनीं अवलोकन करावा—अर्हत्‌रूपी जो परमेश्वर तो उभयतांस सुखी राखो व अशीच सेवा घेवो अशी प्रार्थना आहे.

पु० क०

संकाल ८८७

# उपोद्घात.

ह्या श्रीपालचरित्रांत स्वतांच्या नशीबाची परीक्षा, रंकाचा राजा व राजाचा रंक, लज्जा, कुलीनपणा, दुष्टास शिक्षा, दुष्टबुद्धीचा उदय, व अखेर वाईट परिणाम, स्वहितार्थ परघात, संकटांत पातिव्रत्य संरक्षण, उत्साह, मातृभक्ति, पुत्रप्रीति, स्त्रीप्रीति, विपरीतकाळीं बलवान ते सुपरीतकाळीं हतवीर्य होतात, कपट, अखेर प्रापंचत्याग, मोक्षप्राप्ति, वगैरे विषय यथामति योजिले आहेत.

॥ श्री जिनेश्वरायनमः ॥

# श्रीपालचरित्र.

श्लोक.

आरंभीं जिनपाद गौतम[1]गणा वाचस्पती[2] वंदुनी ॥
सप्रेमें कर जोडुनी विनवितों त्या बुद्धिदा[3] लागुनी ॥
श्रीपालाख्य[4]कथामृता वदतसें द्या साह्यता किंकरा ॥
नाभेयादि[5] जिनाधिपा[6] शिववरा[7] चोवीस तीर्थं[8]-करा ॥ १ ॥

दिंडी.

अमृतरससम हें काव्य गोड होवो ॥
ऐकुनीयां रसिकेंज्ञ[9,10] तोष पावो ॥
हेंच इच्छी अल्पधी कवी मानो[11] ॥
पूर्ण हेतू हा करी देवराणा ॥ २ ॥

## कथानुसंधान प्रारंभ.

### समवशरण पर्वताचें वर्णन.

आर्या.

समवशरण या नामें पर्वत विख्यात विस्तृता भूमी ॥
पुष्पाच्छादित वृक्षहि फल–गर्वें पाहती जणू व्योमीं[12] ॥३॥

---

१ गौतुमऋषि. २ बृहस्पती. ३ बुद्धिदायक. ४ श्रीपाल नावाची. ५ नाभेया आदिकरून. ६ जिनश्रेष्ठ. ७ कल्याण श्रेष्ठ. ८ संख्यात्मक. ९ ज्ञानी मोक्षपद पावलेले. १० मार्मिक (ज्याचें अंतःकरण नवरस जाणतें असा). ११ समजा. १२ आकाशांत.

निर्वैरे[१] सर्व प्राणी वागति जेथें नसेचि मद[२] गर्व ॥
ऐशा सुतल[३]स्थाना योगीजन इच्छिती अहा सर्व ॥ ४ ॥
पापक्षालक[४] दुर्लभ[५] अनुपम्यांचि[६] रम्य त्या समवशरणीं ॥
श्रेणिकराजा जाई महावीरा[७] यतीस जो शरणीं[८] ॥ ५ ॥
शत्रू शरण रणीं ये तरि त्यांतें रक्षिती पहा वीर ॥
अव्हेरील कसा हा ज्ञानीजन जो महायती[९]–वीर ॥ ६ ॥
राजास मान देउनि बैसविलें साधुवृत[१०] त्या यतिनें ॥
श्रेणिकें[११] पुसे तयातें करिसाधो तृप्त कर्ण सुकृतिनें[१२] ॥ ७ ॥
गणधर[१३] सन्निध होता त्यातें आज्ञा करी यतीराज ॥
या श्रेणिक राजातें बा अमृतसम कथा अजी पाज ॥ ८ ॥

साकी.

ऐक नृपाला, कथा सांगतों, सुखदुःखानें युक्त ॥
श्रीपालाची, मदनसुंदरी, भार्या तत्पदिं रक्त ॥ ९ ॥
या दंपत्यें[१४], सुखदुःखाचे, किति नग[१५] उल्लंघावे ॥
कथा मनोरम, पवित्र ऐके, चित्तें ह्यांत रिघावें ॥ १० ॥
धान्यधनानें, अनुपम रम्याहि, आर्या[१६] खंड पवित्र ॥
जंबुद्वीपीं[१७], मालव[१८]देशीं, उज्जनि क्षेत्र विचित्र ॥ ११ ॥

दिंडी.

अशा नगरीचा राव प्रजापाल ॥
जेविं जननी पोषिती लघू बाल ॥

---

१ दुष्टहेतु रहित. २ अहंकारादिक. ३ चांगल्या सुखकारक स्थळास. ४ पापनाशक. ५ मिळण्यास कठीण. ६ उपमारहित. ७ हा शेवटचा तीर्थंकर होता. ८ नम्र होऊन. ९ वर्धमान तीर्थंकर. १० चांगल्या वर्तनाचा. ११ हा राजा मगध देशांत राजग्रह नगरांत राज्य करीत होता. १२ चांगल्या हितानें ( कथारूपी हित ). १३ कथा सांगणारा पुराणिक. १४ स्त्री पुरुषानें. १५ पर्वत. १६ आशिया. १७ हिंदुस्थान. १८ माळवा.

तेवि पाळी विख्यात धर्मशील ॥
जिनेंद्राचा ध्यास हा सर्वकाल ॥ १२ ॥

आर्या.

सौंदर्ययुक्त भार्या ह्मणुनि असे नाम सुंदरा तीला ॥
नृपवर्या ती शोभवि जैशी विद्युल्लताचि मेघाला ॥ १३ ॥
झाल्या सुदैवयोगें कन्या दोनी सुरूप गुण[1]धामा ॥
वंशोद्धार पवित्रा मदनावलि[2], मदनसुंदरी[2] नामा ॥ १४ ॥

श्लोक.

सद्धर्म आचरुनियां पति[3]-देव पूजी ॥
ध्याते पतीसचि सती पर[4]धाम वर्जी ॥
सेवा करी वचन मानि कसें[5] असोही ॥
रुष्टा[6] कधीं न धन प्राप्त असो नसोही ॥ १५ ॥
ज्ञाता जो शिवशर्म-विप्र शिकवी विद्याहि त्यांलागुनी[7] ॥
ज्ञानानें करुनी विशाल, कथिलें राजोत्तमाला झणी[8] ॥
विद्याभ्यास विलोकुनी नृप मनीं तो फार संतोषला ॥
विप्रासी धन वस्त्र देउनि सुखें तो विप्र बोळीवला ॥ १६ ॥

आर्या.

उपवर कन्या होतां पितयाचें काळिजास कांतरते[9] ॥
कांतर[10], सागर सासर पार कसी होय हीच कांतर ते ॥ १७ ॥

श्लोक.

श्रेष्ठा जी मदनावली तिजप्रती राजा ह्मणे कन्यके ॥
शाहाणी अससी ह्मणोनि पुसतों तूं सांग बाले निकें[11] ॥
येतो कोण तुझ्या मनास वर[12] तो जो पूर्णरूपीं गुणीं ॥
सांगोनी मजला अचिंत करिगे जो ध्यास रात्रंदिनीं ॥ १८ ॥

---

१ गुणांचें केवळ मंदीरच अशा. २ नांव. ३ पतीरूपी देव. ४ दुसरें; पक्षी पर ह्मणजे परमेश्वर यांची देवालयें सुद्धां. ५ दुःखकारक. ६ रागावलेली. ७ मुलींनां. ८ तत्काळीं. ९ कातरूं लागते. १० काळजी. ११ खरें. १२ पति.

दिंडी.

काय ताता उत्तरा ह्यास द्यावें ॥
कसें चिंतेतें दूर म्यां करावें ॥
शत्रु नाशाया योग्य अरिदमा[1] तो ॥
व्यथा[2] नाशक तैसाहि अरिदमा[3] तो ॥ १९ ॥
अशय जाणोनी श्रेष्ठ कन्यकेचा ॥
महोत्साहें घडविला योग तीचा ॥
वीर गाढा अरिदमन राजराजा[4] ॥
तया मदनावलि योग्य हीच भाजा[5] ॥ २० ॥

श्लोक.

दुष्टा नष्ट करूनि तुष्ट करण्या सुष्टासभा बैसली ॥
स्पष्टा सांगति न्याय स्पष्ट रितिनें अष्टावली[6] शोभली ॥
भ्रष्टाचार नसे प्रतिष्ठितपणें जे शिष्ट आधिष्ठ[7] ते ॥
निष्ठा राजपदीं धनिष्ट धरिती दासा नसे कष्टते ॥ २१ ॥
सभेंत[8] सिंहासनि राजराज तो ॥
प्रधान योगेंचि प्रभा प्रभावती[9] ॥
कन्या तिथें ये मृदु हस्य आस्य[10] ते ॥
देखूनि आनंद अवश्य वर्ध्येते[11] ॥ २२ ॥
तन्वंगी[12] नृपकन्यका रतिसमा रूपें दुजी[13] सुंदरी ॥
श्रीपाला करितां श्रमोनि विधिनें निर्माण केली खरी ॥
सद्विद्यारत[14] जी पित्यास नमुनी सन्नीध ती बैसली ॥
तीच्या सस्मित भाषणें करुनियां सारी सभा तोषली ॥२३॥

ओंव्या.

कन्येकडे न्याहाळून ॥ पाहे वामांगाकडे वळून ॥

---

१ शत्रूचा पराभव करण्यास. २ माझी काळजी. ३ नांवाचा. ४ राजश्रेष्ठ. ५ विवाहित स्त्री. ६ अष्टप्रधान. ७ बसलेले. ८ शोभतो. ९ पराक्रम. १० मुख. ११ प्रसन्न. १२ कोमलांगी. १३ दुसरी मुलगी. १४ चांगल्या विद्या शिकलेली.

काव्य १३०
संकलन ८८८



तों तारुण्य आलें कळून ॥ नृपवर्यातें ॥ २४ ॥
कन्येप्रती नृप ह्मणे बाले ॥ वरा योग्य वय तुझें झालें ॥
मदनावली अक्का[1] जेंवि बोले ॥ निजानंदानें ॥ २५ ॥
जिवलगे, तूंही मला सांग ॥ तुझ्याही इच्छा करितों सांग[2] ॥
पतिगृहीं सुखें भोग भोग ॥ शिवार्या[3] जेंवी ॥२६॥
भीड न पडे पथ्यां[4] ॥ सुज्ञें सोडूं नये तथ्या[5] ॥
पतिजन्मसंगती हें मिथ्या ॥ न घडे वो सुंदरी ॥ २७ ॥
सुंदरी ह्मणे ताता ॥ माझेनें न वदवे आतां ॥
विधिनिर्मित तोच हस्ता ॥ होम[6]समयीं धरील ॥ २८ ॥
मला ज्ञात नाहींत सर्व नृपती ॥ कुलगोत्र कैंवी ज्ञानी असती ॥
चिंता न करावी तात; चित्तीं॥पूर्वपुण्याधीन गोष्टी ही ॥२९॥

श्लोक.

रक्षीतें बहुसंकटीं सुकृत[7]हो जन्मांतरीचें सदा ॥
हे ताता सुकृताधिना–गति असे मी काय बोलूं वदा ॥
माझें पुण्य जसें तसेंचि विधिनें मद्भाळिं[8] लेखीयलें ॥
माझी कां तुह्मि काळजी करितसां होणार तें नाटळे ॥३०॥

आर्या.

ज्ञानी बाळक झाला मूढ पित्यातें खराचि अल्पमती ॥
वाटे, यास्तव तनुजें थोरपणानें वदूं नये स्वकृती[9] ॥३१॥
दुर्गंधि मूळं[10] भक्षुनि अग्रासीं वृक्ष पुष्प फळ देतो ॥
फलपुष्प मूळ निंदिल तरि त्यातें कोप कां न फळ दे तो ॥३२॥
नृपति ह्मणे बाले तूं पढविशि मजला तरी तुला कथितों ॥
त्वद्भाळीं ब्रह्मलिखित काय कसें पुण्य कोणतें बघतों ॥३३॥
षड्वैरि काय करितिल याचा कांहीं न राहिला नियम ॥
प्राक्तन[11] सहाय असतां काय बरें करिल दीन हानि यम ॥३४॥

---

१ थोरली बहीण. २ पूर्ण. ३ शंकरपार्वती. ४ उपयोगीं. ५ खरें. ६ लग्नानंतर होम होतो त्यावेळीं वरानें नवरीच्या हातास धरावें लागतें. ७पुण्य. ८माझे नशीबीं. ९स्वतांचें करणें. १० झाडाची मुळी. ११प्रारब्ध.

कोणे एके दिवशीं राजा गेला वनास क्रीडेतें[1] ॥
भागुनि छाये बसला तव तेथें कुष्ट[2] मंडळी येते ॥ ३५ ॥
दुर्गंधियुक्त शरिरें बघतां पू रक्त चित्त थरथरतें ॥
कुष्टादिक रोगी हे शुभ्र तसे कृष्णवर्ण विचरति[3] ते ॥ ३६ ॥
साली काढिति तनुच्या जीर्णा पदरास प्राप्त झाल्या त्या ॥
रुधिराच्या नाशानें लाल दिसे गलित कुष्ट शरिरा त्यां[4] ॥३७॥
अतित्रस्त रोगपीडित गतकांती त्यांत एक श्रीपाल ॥
त्यांतें पाहुनि नृपती मनिं योजी हाच कन्यका[5] पाल ॥ ३८ ॥
यांतें देउनि पाहूं भाग्य कसें पुण्य कोण सुंदरिचें ॥
करुनी निश्चय ऐसा शीघ्र पुसे हो चला गृहा अमुचे ॥ ३९ ॥

दिंडी.

बालकाच्या हातून चुकी झाली ॥
तरी त्यावर पाहिजे कृपा केली ॥
त्यास वदती तो बाप पापनाशी[6] ॥
गुणाविरहित ह्या तात कसा होशी ॥ ४० ॥
सर्वं घेउनि श्रीपाल मंडळीतें ॥
राव आला कीं सुखें उज्जनीतें ॥
वृत्त कळवीलें गुप्तगृहीं[7] सर्व ॥
अनर्थाचें वाटलें तया पर्व[8] ॥ ४१ ॥

कामदा.

भूपती ह्मणे कन्यके प्रती ॥ आणिला असे गे तुला पती ॥
पाहिजे नको सांग पाहुनी ॥ पूर्व पुण्य तें पाहुं नंदिनी[9] ॥४२॥

साक्या.

राजमुखींच्या परिसुनि वृत्ता शोकें व्याकुल झाली ॥
राज्ञिसुंदरा ह्मणे नृपातें गति कैसी हे केली ॥ ४३ ॥
नऊ मास ज्यां उदरीं ठेउनि जीस अजि पाळीलें ॥

---

१ वनक्रीडा करण्यास. २ कोडी. ३ वागतात. ४ त्यांच्या. ५ मुलीस वर. ६ कल्याणकर्ता. ७ जनानखान्यांत. ८ पर्वणी (अतीशय). ९ मुली.

सुंदर कन्या रत्न प्रिया हे कुष्टा स्वाधिन केलें ॥ ४४ ॥
हंसी माझी मदनसुंदरी काका कैशी देतां ॥
पतिराया हो दया कराजी गोष्ट कशी ये चित्ता ॥ ४५ ॥
जात स्त्रियांची धेनुसमाना गरीब जाणुनि ज्ञाते ॥
स्थान सुखाचें पाहुनि देती पत्य[२]नुगामी हो ते ॥ ४६ ॥
गाय [३]कसाबा स्वाधिन करतां नृपती कोण ह्मणेल ॥
अशा कृतीनें अबालवृद्धहि जन [४]आह्मां हांसेल ॥ ४७ ॥
बरोबरीच्या वरी प्रतिज्ञा करणें योग्य प्रियाला ॥
ज्ञात असोनी माहाराजा अनर्थ हा कां केला ॥ ४८ ॥
राज्ञीच्या ह्या बोला ऐकुनी रागें राव निघाला ॥
राजकचेरी सभाहि भरली तेथें शीघ्र रिघाला ॥ ४९ ॥
राज्यधुरंधर प्रधान वदती माफी मात्र असावी ॥
लग्नविधी हा विचित्र[५] भासे शांतावृत्ति धरावी ॥ ५० ॥

अनुष्टुप.

आत्मबुद्धि हितार्थाय । न्याय आणुनिया मना ॥
कन्या समर्पी श्रीपाला । वाटलें दुःख तें जना ॥ ५१ ॥

चामर.

हाय हाय काय काय सौख्य कन्यके तुला ॥
दुष्ट बाप नष्ट माय कष्ट मात्र ते मला ॥
नाथ घात! घात! ह्यांत पातकास पावलां ॥
ऐकुनीहि दुःख वंदि कन्यकाच पावलां ॥ ५२ ॥

शार्दूलविक्रीडित.

नाहीं दुःख मला अई करूं नको माझी आतां काळजी ॥
ऐशीं शांतवचें मधूर वदुनी, चित्तांत श्रीपालजी ॥

---

१ कावळ्यास. २ पती जिकडे जाईल तिकडे चालणारी ह्मणजे त्याच्या वचनाप्रमाणें वागणारी. ३ गोवध करणारा. ४ रानेपणानें वागणाऱ्यांस. ५ वि ( गेलेला )+चित्र ( सुशोभितपणा )=आनंदरहित चमत्कारिक.

ध्याई, नित्य महाजिना पुजितसे भक्त्योदरें ती येदा ॥
निष्ठायुक्त तिची स्थिती बघुनियां तो ईश पावे तदा ॥ ५३ ॥

श्लोक.

चला प्राणनाथा ह्मणें सुंदरी ती ॥
इथें राहण्याची नसे न्याय-रीती ॥
पहा! आप्त हे हीणवीती अह्मातें ॥
जसें सौख्यरानीं नसे ह्या घरीं तें ॥ ५४ ॥
संगें मेळा घेतला रोगियांचा ॥
श्रीपाळाशीं चालली मोदवाचा ॥
कांताच्या ती पायिं लावोनि दृष्टी ॥
पातिव्रत्यें धन्यता दावी सृष्टी ॥ ५५ ॥
चालतां पथिं सरोवर देखिलें ॥
पाहतां सतिचिये मन तोषलें ॥
देखुनी अति मनोरम स्थान तें ॥
राहिली वनिं पतीसह हर्षतें ॥ ५६ ॥
साध्विव्रता कांत सवेंचि हर्षते ॥
सन्नीधवासांतचि सौख्य मानिते ॥
कांताचिया तत्पर पादसेवे ॥
देवास ध्याती बहु शुद्ध भावें ॥ ५७ ॥

शिखरिणी छंद.

जिनाच्या पादाब्जीं सतत मन लावी नृपसुता ॥
सुकर्मी कष्टे ती सतत लय ध्यानीं पतिहिता ॥
करी हर्षे प्रीती रुचिकर वदे हास्यवदनीं ॥
पती रोगी कोडी तरि लवभरी दुःख न गणीं ॥ ५८ ॥
नंतातें संरक्षी भवनिधिंतुनी पार करूनी ॥

---

१ मोठ्या भक्तीच्या प्रेमानें. २ जेव्हां. ३ कमीपणानें थट्टा करतात. ४ आनंदयुक्त जिचें बोलणें अशी ती. ५ पृथ्वीस. ६ सरळ आचाराचें व्रत जिचें ती. ७ शरणांगतास. ८ संसाररूपी समुद्रांतून.

असे देवाजीचे सुगुण अठवीते निशिदिनीं ॥
धरोनी भावातें तरुनि बहु गेले जन गुणी ॥
अशी कीर्ती आहे ह्मणुनि जिन ध्याई निजमनीं ॥ ५९ ॥

आर्या.

धरितां स्मरण जिनाचें पावे तत्काल वत्सलोर्णव[1] तो ॥
पदिं पदिं संकट वारी दीना दासा कसा न वर्णवतो ॥६०॥
केली दयार्द्र दृष्टी भक्ती ती एकनिष्ठ भावाची ॥
दंपत्याची पाहुनि कांती केली सुरम्य देहाची ॥ ६१ ॥
भगवन् प्रसन्न होतां केव्हां कधिं काय कोणतें करिल ॥
याचा नियम नसे कीं ज्ञानाऽज्ञानास[2] जो सदा वडिल[3] ॥६२॥
पति सुस्वरूप पाहुनि साध्वी साश्चर्य हर्षिता झाली ॥
दैवी कृति ही जाणुनि देवाची प्रार्थना तिनें केली ॥ ६३ ॥
क्लेशशतें भोगिती परी कृपणाचें चित्त वित्त लक्षीतें ॥
सौख्य पतीचें देखुनी साध्वी मोदान्न[4] जाण भक्षी तें ॥६४॥

कामदा.

तरुण दंपती सौख्य सागरीं ॥
सतत पोहती ते परोपरी ॥
रुचतशा जशा आपुल्या मना ॥
सफल जाहल्या सर्व कामना ॥ ६५ ॥

श्लोक.

हलुच हंसुनि बोले सुंदरी प्राणनाथा ॥
कवण कुटिल राजे देश तो कोण होता ॥
श्वशुर[5] कवण माझे मायशी सासुबाई ॥
विकृति[6] तनुस कैशी प्राप्त झाली अगाई ॥ ६६ ॥
प्रीतिनें जिवलगा मज सांगा ॥

---

१ दयासागर. २ ज्ञानी व अज्ञानी यांस. ३ श्रेष्ठ ( आदि ).
४ सुखरूपी अन्न. ५ सासरा. ६ विकार.

काय कारण घडे गृहे[1]त्यागा ॥
देखुनि प्रियतमा अतिकाया[2] ॥
वृत्त सर्व कथि तो सुखधा[3]मा ॥ ६७ ॥

ओंव्या.

अंगद देश चंपा[4]पूर ॥ राजधानींचें हें नगर ॥
पिता सिद्धार्थी राजेश्वर ॥ राज्य करी नीतीनें ॥ ६८ ॥
साध्वीव्रता कमलावती ॥ माझी माता फार सुमती ॥
तिची नृपावरी किती प्रीती॥होती ह्मणून तुज सांगूं ॥६९ ॥
त्या वृक्षाचें हें श्रीफळ ॥ तूतें प्रिय जो श्रीपाल ॥
रोगिष्ट असतांही त्वां माळ ॥ घालून पती केला कीं ॥७०॥
काय जन्मा आलों करंटा ॥ तातास दाविल्या स्वर्गवाटा ॥
मातेच्या सौभाग्यीं वरवंटा ॥ ह्यांचि फिरविला प्रिये कीं॥७१॥
जन्मलों वीर वंशा मधीं ॥ कां[5]का कुधी राज्य साधी ॥
वंशच्छेदन करावयाची बुद्धी ॥ उपजे त्यास अनिवार ॥७२॥
हें वृत्त कळलें चोर[6]चार मुखें ॥ ह्मणूनी राज्य केलें पार[7]खें ॥
वनीं आलों दुःखें हरिखें[8] ॥ मरण धाकें भ्याड हीं[9] ॥ ७३ ॥
येतां वनीं कोड जडला ॥ कोठील दोष डाई पडला ॥
तो डाव त्यानें साधिला ॥ मातेसह वनीं हिंडलों ॥ ७४ ॥
तुझा पिता आला [10]क्रीडेतें ॥ मंडळीसह आह्मी तेथें ॥
सहज असतां आह्मांतें ॥ बोलवूनी आणिलें ॥ ७५ ॥
तेव्हां माय माझी चुकली ॥ जी सर्व सुखातें आंचवली ॥
आतां ती सुखाची सांवली ॥ कधीं सखे भेटेल ॥ ७६ ॥
प्रिये चला जाऊं तुझे नगरा ॥ मातेचा मार्ग पाहूं बरा ॥
तुला मलाही तोच थारा ॥ कृपा स[11]रितेचा ॥ ७७ ॥

---

१ गृहनष्ट होणें ह्म० गृह सोडण्यास. २ अतिउत्सुक. ३ सुखमंदिर श्रीपाळ. ४ भावलपूरचें पूर्वीचें नांव. ५ चुलता. ६ चोर (गुप्त) जासूद. ७ सोडलें. ८ हर्षानें. ९ आह्मीं दोघे. १० वनक्रीडेस. ११ नदीचा.

सं०काव्य ७८८

पुन्हा आलीं नगरासी ॥ उभयें वंदिलें नृपासी ॥
काया सुंदर पाहोन तयासी ॥ हर्षें वृत्त सांगितलें ॥ ७८ ॥

दिंड्या ( मातेचा शोक. )

कुठुनि आली हे झोंप मला देवा ॥
कोण मेला साधिला असा दावा ॥
बाळ माझा अशक्त रोगी बाई ॥
भेट होण्याला गती करूं काई ॥ ७९ ॥
हाय श्रीपाला ! काय गती झाली ॥
तुझी माता ही व्यर्थ तुला व्याली ॥
नाथ, राज्य, नष्ट हो दुःख नाहीं ॥
भेट होण्याला गती करूं काई ॥ ८० ॥
अरे श्रीपाला ! मातृभक्त पुत्रा ॥
माय हंबरडे फोडिती पवित्रा
ह्मणत होतासी सदा अई आई ॥
भेट होण्याला गती करूं काई ॥ ८१ ॥ ॥
शोक भरिता चालली राजवाटे ॥
पुत्र शुद्धी पुसती कुणी भेटे ॥
बाळ माझा देखिला काय ताई ॥
भेट होण्याला गती करूं काई ॥ ८२ ॥
पडत उठते चालते रडतमाय ।
वियोगानें ती रडे धाय धाय ।
ह्याच मार्गे कां वत्स एक जाई ।
भेट होण्याला गती करूं काई ॥ ८३ ॥
नेत्र उघडुन पाहिलें दिव्यपूर ॥
पुत्रशोकें चालला अश्रुपूर ॥

---

१ सर्व कोड्यांला नृपानें नेलें त्या वेळीं श्रीपाळाच्या आईस श्रमामुळें डोळा लागल्यावर श्रीपाळ नाहीं असें पाहून ह्मणते. २ प्रसवली. ३ मातोश्रीची भक्ति करणाऱ्या अशा माझ्या श्रीपाला. ४ मोठें नगर.

इथें माझा तान्हुला दिसत नाहीं ॥
भेट होण्याला गती करूं काई ॥ ८४ ॥
राजमार्गें चालतां फार कष्टी ॥
राजधामा देखिले तिनें दृष्टीं ॥
[1]अरे श्रीपाला ऐकूं येत नाहीं ॥
पुत्र भेटाया गती करूं काई ॥ ८५ ॥

श्लोक.

पुढें चालली ऐकुनी शोकवाणी ॥
प्रिये ऐकिली वाटतें माय वाणी ॥
त्वरें जाउनी गांठिली माय कष्टी ॥
अई मी तुझा पुत्र श्रीपाळ लक्षी ॥ ८६ ॥

दिंडी.

नेत्र मिटिले उघडूनि जरी पाहे ॥
अशा कायेचा[2] पुत्र मला नोहे ॥
ह्मणून त्याला पूसती सती बाई ॥
पुत्र भेटाया गती करूं काई ॥ ८७ ॥

इंद्रवंशा.

मार्गी चला दाखवितो सुताला ॥
श्रीपालही देखुनि दुःखि झाला ॥
घेऊनि आला निज मातृसद्मा ॥
[3]साक्षात जी जन्मचिदाति पद्मा ॥ ८८ ॥

आर्या.

अश्रु[4]त सर्व वृत्तें सांगुनि हरिलाहि मातृहृ[5]त्ताप ॥
भेटीवली स्वकांता शीघ्र हरायास तीव्र हृ[6]त्पाप ॥ ८९ ॥

---

१ राजवाडा पाहून आपल्या पूर्व स्थितीचें स्मरण होऊन हे श्रीपाला, तूंही अशाच वाड्यांत राहत होतास व असायाचा हें मनांत येऊन ह्मणते. २ सुंदर शरीराचा. ३ खरोखर जन्म देणारी मातोश्री लक्ष्मीसारखी. ४ न ऐकिलेली. ५ आईच्या अंतःकरणास जो संताप झाला तो. ६ मनांतील विकल्प.

श्लोक.

विभू बीजमंत्रा प्रती थोर माना ॥
जिनाधीश देवेंद्र चित्तांत आणा ॥
गती पाहिजे चांगली ज्यास त्यानें ॥
जपावें सदा अंतरीं एक ध्यानें ॥ ९० ॥
घरा मंदिराचा उपद्व्याप[२] सारा ॥
दिसे राज्य, साम्राज्य, खोटा पसारा ॥
धनादीक सारीं लयालागीं जाती ॥
स्थिती मुक्तासारखी प्राप्त होती ॥ ९१ ॥

आर्या.

कोणे एके दिवशीं जीनप्रभु सोंग धरुनि भाटाचें ॥
नेटें बाणि पुकारीं निर्भय ज्याच्या[३] रवि-प्रभा-टाचे ॥ ९२ ॥

बाणी.

स्वस्ति श्री नरवर[४] मुकुटमणी-
राजाधिराज चिंतामणी[५]-
प्रतिनिधि अनर्घ्य[६]रत्न खाणी-
स्वाधिकारी[७] दक्ष तत्पर रक्षणीं-
सैन्य[८] दैन्य रहित उद्दाम मुद्दाम-
शत्रू[९] मर्दिती याचक होती पूरितें[१०] काम
निष्पाप[११] कीर्ति सूर्यप्रभा प्रकाशमान
हीनदीनपंग्वंधे[१२] धरिती निजमनीं जीन ध्यान
श्रीपालजी जामात याचकको तृप्ति करो
चिंता हरो, दयाकरो जय जिनेश्वर महाराजकी जय॥९३॥

---

१ श्रेष्ठ. २ खटाटोप. ३ ज्या अर्हताच्या पायाच्या टाचेचें तेज सूर्याप्रमाणें. ४ राजा. ५ इच्छित देणारा. ६ अमूल्य. ७ आपल्या कार्यांत तत्पर. ८ सेना आलंकृत शूर अशी. ९ शत्रूचा घात. १० पूर्ण हेतू. ११ निर्मळ कीर्ति. १२ गरीब पांगळे, आंधळे.

शा० वि०

जामातासह[1] भूप तो सदसिं[2] त्या सिंहासनीं राजतो[3] ॥
वाणीतें वदुनीहि भाट विनवी जामातृ[4] राजास तो ॥
माते वित्तभरी कराल तरि जी वाढेल कीर्ति महा ॥
तोटा[5] काय तुम्हां वरांक न कधीं कीं चिंतिता जी अहा॥९४॥

आर्या.

बोलूनी वाक्य ऐसें झाला तो गुप्त भाट त्या ठायां ॥
जामातृ शब्द त्याच्या टोंचे सुंदरि-पतीस जाचाया ॥ ९५ ॥
श्रीपाल मनि म्हणे कीं मात्रोदरीं व्यर्थ जन्मलोंचि खर[6] ॥
पितृगृह सोडुनियां श्वशुरगृहवासकास धिःकार ॥ ९६ ॥
गृह त्यागितांच आंगण परदेशी ही म्हणी असे सत्य ॥
परगृह वास कठीणचि श्वशुरगृहवास हा नको नित्य ॥ ९७ ॥
प्रथम दिशीं जी प्रीती आदर असतो तसा नसे दुसरे- ॥
दिवशीं मान तयातें तिसऱ्या दिवशींच भासतो दुसरे[7] ॥९८॥
जगदोद्धार जिनेश्वर प्रभु यानें निद्रितास जागविलें ॥
पळही न राहुं येथें म्यां दुष्टें विविध[8]मान नागविलें[9] ॥ ९९ ॥
श्रीपाल मंदिरीं ये जाणुनि उभि राहिलीच सुंदरि ती[10] ॥
मृदुहास्य करुनि चाले नाथाच्या दर्शनास मंदगती ॥१००॥
कुमुदिनि[11] सोज्वल असतां नवल नव्हे काय? शुष्कमुखचंद्र[12] ॥
इंद्रायणी[13] सुखावे कशि दृष्टी पाहुनी असुख[14] इंद्र ॥ १०१
नरपति म्हणे प्रिये गे येथें वसणें मला नसे उचित ॥
झाली उत्कंठा गे स्वगृहगमना मनास ह्या खचित ॥ १०२ ॥

शा० वि०

पौरुष्यें[15] नर वागतां जिवलगे तो श्रेष्ठ ह्या भूतलां ॥
कांतेच्या धन सेवनें नर सदा तो डाग लावी कुला ॥

---

१ श्रीपाल. २ सभेत. ३ शोभतो. ४ श्रीपाल राजा. ५ उणेपणा. ६ गाढव. ७ दुसमान. ८ अनेक. ९ घालविलें. १० श्रीपाल स्त्री. ११ चांदणी रात्र. १२ निस्तेज चंद्रमुख. १३ इंद्र पत्नी. १४ दुःखी. १५ पराक्रमें.

निर्वीर्यें[1] बसतां स्वराज्य गतही स्वाऽप्राप्त[2] तें होतसे ॥
ऐसी रीति असे करूं नृप वदे वास्तव्य येथें कसें ॥१०३॥

दिंड्या.

क्षात्रवंशीं[3] मी भूप होउनीयां ॥
नसे कीर्ती परगृहीं राहुनीयां ॥
याजकारितां मद्देशिं[4] सखे जातों ॥
जिंकुनीयां शत्रूस राज्य घेतों ॥ १०४ ॥
तुह्मी जातां तरि मला सवें न्यावें ॥
वियोगाचें तें दुःख न हो ठावें ॥
प्रिया ! विनवीतें जोडुनियां पाणी ॥
दयासिंधो आयका दीनवाणी ॥ १०५ ॥
नाथवृक्षावर सतीलता[6] वाढे ॥
तरू जातां वेलीहि सर्व मोडे ॥
कामिनीचें पतिवीण जिणें व्यर्थ ॥
शशीविणें रात्रींत काय अर्थ ॥ १०६ ॥
अशी बोले सुंदरी दिनावाणी ॥
नृपा भासे कामिनी दिनावाणी ॥
नृपें पुसले पल्लवें तिचे नेत्र ॥
आलिंगीलें प्रीतिनें मृदुगात्र ॥ १०७ ॥
प्रवासाचें तें दुःख नसे ठावें ॥
ह्मणुनि गमतें गे तुला सवें यावें ॥
स्वस्थ सदनीं राहणें योग्य पाहीं ॥
मायें सांभाळीं दुःख नको कांहीं ॥ १०८ ॥

श्लोक.

राजा ह्मणे द्वादशं वर्ष होतां ॥

---

१ पराक्रमरहित. २ स्वताहास मिळणें कठिण. ३ क्षत्रिय कुलांत. ४ माझ्या देशास ( भावलपूर ). ५ हस्त. ६ वेली. ७ पदरानें. ८ मृदुशरीर. ९ मातोश्रीस. १० बारा.

येईन कांते मनि हर्ष चिंता ॥
माते पदीं ठेउनि भाळ बोले ॥
येतों ह्मणूनी गमनास केलें ॥ १०९ ॥

आर्या.

भृगुकच्छपट्टणाला[1] हर्षे श्रीपाल तूर्ण गेला हो ॥
चैतालयें[2] अनुपमें देखुनियां पावला मनीं लाहो[3] ॥ ११० ॥

कामदा.

पूर तें असे फार सुंदर ॥ पुष्प वाटिका त्या मनोहर ॥
कांत कामिनी सूत आणिक ॥ सर्व पाळिती धर्म श्रावक[4]॥१११॥

शु० का०.

ढवळ शेटजी श्रेष्ठ त्या पुरीं ॥ उदिम चालती ते परोपरी ॥
बहुत तारवें हिंडवी तरी ॥ कितिक येति जातीच सागरीं ॥११२॥

साक्या.

दीनोद्धार समर्थारे ॥ संकट सर्व निवारीरे ॥ धृ० ॥
नौका यानीं बैसुनि राजा पुढती शीघ्र निघाला ॥
शेटी ढवळा संगें येतां फार अनंदी झाला ॥ ११३ ॥
अफाट जलधी[5] मधें जाहलें तुफान[6] भारी मोठें ॥
धैर्य पळालें डळमळतां तें[7] लोकहृदय तें फाटे ॥ ११४ ॥
अवलोकावें तिकडे पाणी होय तुफानचि वारा ॥
बुडतों किंवा मरतों नकळे न दिसे कोठें थारा ॥ ११५ ॥
माय बाप सुत कन्या दारा[8] कोणी नाहिंत येथें ॥
भेटुन बोलूं किंवा जावूं आतां मृत्यूपंथें ॥ ११६ ॥
प्राणसंकटीं निरूपाय तो जीव होय बहु वारा ॥
अक्कल बुद्धी गुंग होत तें देना धरणी[9] थारा ॥ ११७ ॥

---

१ भडोच शहराचें पूर्वीचें नांव. २ देवालयें. ३ हळहळ. ४ जिनधर्मी. ५ समुद्र. ६ वादळ. ७ तारूं. ८ बायको. ९ भूमी.

ऐशा समयीं श्रीपालाधिप तारूवरतीं होता ॥
सुलक्षणी[1] तो बीजमंत्र तैं झाला संकटिं ध्याता ॥ ११८ ॥

पृथ्वी छंद.

अनर्थ समयीं अशा जिनपतीस तो भूपती ॥
स्मरोनि गुणसागरा तई तसाच आपांपती ॥
ह्मणे सरितनाथ[2] तूं अजि अह्मांवरी कोपसी ॥
दयाळ परमेश्वरा जिनपती अतां तारिसी ॥ ११९ ॥
स्तुतिप्रिय ह्मणूनियां सहज संकटीं पावला ॥
दिनस्वर करूनियां श्रवण ईश तो धांवला ॥
हळू हळु अहा कशीं सहज चाललीं तारवें ॥
दया जिन करी तरी भजक[3] हा न कां तारवे[4] ॥ १२० ॥
तई जिनकृपेकरूनि अवघे अले कीं तिरा ॥
जिन स्वरुप हेंच हो ह्मणुनि वंदिती भू-वरा ॥
अहा गुणनिधी तुझ्या सहज प्रार्थनें वांचलों ॥
ह्मणूनि अजि भूवरी अति मुदें[5] बरें नाचलों ॥ १२१ ॥

आर्या.

विपरीत काळ येतां संकटिं विघ्नें वरीवरी[6] येती ॥
व्युत्क्रम स्थिति[7] होतां ती सौख्यावरि सौख्यही तसें देती ॥१२२॥

शा० वि०

त्यावें द्वीपतटास जों करिति ते चिंता मनीं चाकर ॥
तों रात्रीं समयीं चढोनि वरतीं येती पहा तस्कर[8] ॥
मारीती हणिती कहार करिती शून्यें विचारें कुधी ॥
हर्षोत्कार[9] ध्वनी करोनि शिरले त्या तारवाच्यामधीं ॥१२३॥
शस्त्रास्त्रांत निपूण धीट हरिसो[10] हें कृत्य तो पाहुनी ॥

---

१ बत्तीस लक्षणेंयुक्त. २ समुद्र. ३ भक्ति करणारा. ४ रक्षवे. ५ आनंदानें. ६ वरचेवर. ७ अनुकूळ काळ आल्यावर ( उलट स्थिती ). ८ चोर. ९ आनंदाचा शब्द. १० सिंहासारखा.

वीर[1]श्रीकरुनी धनूस धरुनी आकर्ण[2] ज्या[3] ओढुनी ॥
गर्जे जैं चपला[4] तसा करुनियां गंभीर[5] चापध्वनी ॥
ऐकूनी धरिती कितीक दडती खंकाळ त्या बांधुनी ॥ १२४ ॥
श्रीपालें अणुनी गरीब ढवळा शेटी तया सोडवी ॥
गाजी धन्यच धन्य हा त्रिभुवनीं नामा यशा गाजवी ॥
येती जे शरणी अवध्य[7] गणुनी केलें तयातें खुलें ॥
अत्यानंद करूनियां सकलही द्वीपांतरीं पोंचले ॥ १२५ ॥

साक्या.

रत्नपुरी ती नयनीं देखत पावति जन विश्राम ॥
अर्हत्पूजेवीण न अन्ना भक्षिति दृढतर नेम ॥ १२६ ॥
सुवर्ण रत्नें जडित कळस ते त्याची सुंदर कांती ॥
रवितेजानें झळकति गगनीं नेत्राला सुख देती ॥ १२७ ॥

कटाव.

॥ चैतालय सुंदर मोठें ॥ पहातां अमरपुरी[9] वाटे ॥ धृ० ॥
चैतालय हीं सुंदर दिसती । कांचनमय तीं फार शोभती । कळस झळकती । गगना चुंबिती । विलोकितां वर नेत्र फाटती । हर्षित होई बघुन भूपती । प्रवेशावें ऐसें चित्तीं । अंतरगमना फारच युक्ती । कोटिविप्र[10] तो तेथ जाउनी । वज्रकपाट द्वार बघूनि । स्तब्धच होती मौन धरूनि । द्वारीं रक्षक हस्त जोडुनी । त्यांतें श्रीपालानें पुसुनी । रत्नखचित तें द्वार उघडुनीं । हस्तस्पर्शाची ही करणी । साक्षात् जिनमुख पाहुनि नयनीं । आनंद मनीं दाटे ॥ पाहतां अमरपुरी वाटे ॥ १२८ ॥ रविबिंबद्युति[11] तेज आगळें । सर्वसाक्ष तो ध्यानीं घोळे ॥ पायीं लोळे । सुगंध मिश्रित नीर घेतलें । सद्भावानें नाहुं घातलें । सुगंधचंदन वरी लेपिले । सुमन हार ते कंठिं अर्पिले ॥ धूप दीप ते किती लाविले ।

---

१ पराक्रमानें. २ कानापर्यंत. ३ धनुष्याची दोरी. ४ वीज. ५ भयंकर टणत्कार. ६ दांडगे. ७ वध करण्यास अयोग्य. ८ बळकट. ९ देवेंद्रनगर. १० श्रीपाल विशेषण. ११ प्रकाश.

पक्वान्नाचें पात्र वाढिलें ॥ भक्तिप्रेमें त्यास प्रार्थिलें । स्वर्गींचे सुर पाहुं मिळाले । आशीर्वचनें[1] देति आगळे । राजेंद्राचें पद हें निश्चिंती[2] । श्रीपालातें मिळेल म्हणती । सौख्य सागरीं तरेल वदती । असो राज तो । पूजा सारुनी । गुणगीयमान[3] । मंडपीं बैसे । आनंद जणु भेटे ॥ साक्षात् अमरपुरी वाटे ॥ १२९ ॥

आर्या.

विद्याधर[4] येउनियां अर्हत्पदकमल वंदितो भावें ॥
श्रीपालास म्हणे कीं कां केलें गमन सत्य सांगावें ॥ १३० ॥
तव सोज्वल[5] कीर्तीनें त्रिभुवन भरिलें म्हणोनि श्रीपाल ॥
तुजसम जगीं न दुसरा वर्णाया योग्य तूंचि श्री-पाळ[6] ॥ १३१ ॥
या रत्नपुरीं शोभे विद्युत्प्रभ जाण हा गुणाधीश ॥
चित्रविचित्रहि नामें तनय सुता मंजुषी असे त्यास ॥ १३२ ॥
सद्विद्यारत[7]-बाला पाहुनि बालाच काळजी लागे ॥
कोण हिला वर मिळतो नृपवर जळतोच अंतरीं रोगें ॥ १३३ ॥
कोणे एके दिनिं तो[8] विद्युत्प्रभ मुनिपदास वंदून ॥
बोले जी मुनिवर्या देखा जामात एक सुज्ञान ॥

ओंव्या.

विद्याधर मुखींचीं शब्द मुक्ताफळें[9] ॥ श्रीपालें कर्णीं घातलीं सकळें[10] ॥
मरा‍ळें[11] मनीं फार डोले ॥ वेध लागला मंजुषिचा ॥ १३४ ॥
विद्याधरें चारें[12] सत्वर ॥ पाठवूनि कळविलें वृत्त समग्र ॥
हेरें[12] सांगती, राजेश्वर ॥ नवल एक ऐका जी ॥ १३५ ॥
जी एक आला पुण्यप्राणी ॥ 'श्रीपाल' ऐसें त्रिभुवन वर्णी ॥
त्यानें लावोनियां स्वपाणीं ॥ वज्रकपाटा उघडियलें ॥ १३६ ॥

---

१ आशीर्वाद. २ खचित. ३ गुण गाण्यास योग्य, हें श्रीपालाचें विशेषण. ४ पूजक, उपाध्याय. ५ प्रकाशित. ६ राज्यस्वीकार. ७ चांगल्या विद्या शिकलेली. ८ विद्युत्प्रभ राजास. ९ मोतीं. १० ऐकिलीं. ११ श्रीपाल. १२ चाकर.

कामदा.

ऐकुनी असे रत्नभूपती ॥
सर्व लोकही हर्ष पावती ॥
यावया तया दूत धाडिले ॥
पाहया किती लोक चालिले ॥ १३७ ॥
मंजुषी सुता मोद पावली ॥
माये[1] ये तिथें त्याच पावलीं ॥
मंत्रि सर्वही आप्त सोयरे ॥
भेटले श्रिपालास आदरें ॥ १३८ ॥

साक्या.

पूर्ण लग्नविधि होतां बैसे सुखासनीं तो राजा[2] ॥
त्याची सेवा अतिप्रीतीनें करि ती मंजुषि भाजा ॥ १३९ ॥

मालिनी.

ढवळवणिज वर्णी शांत भूपाल गूण ॥
तुजसम भुवनीं या भूप नाहींच कोण ॥
युवति सुरुप धन्या कन्यका राजयाची ॥
सतत करिति सेवा एकचित्तें जयाची ॥ १४० ॥

साक्या.

ह्मणे शेटजी श्रीपालातें जातों अपुल्या देशीं ॥
आलों तैसे परत जाउं कीं स्नेहत्वें जरि येशी ॥ १४१ ॥
देशीं जाण्या निरोप घेउन प्रभुचा, बैसे राय ॥
सुंदरमंजुषि सवें घेउनि यानीं[3] हर्षित जाय ॥ १४२ ॥
युवतीरूपीं लुब्धचि झाला ढवळशेट चित्तांत ॥
कामरोग हा दुस्तर[4] आहे नचि अवरे निभ्रांत ॥ १४३ ॥
नूतन यौवन बहु सुकुमारी पीन[5]-पयोधर जीचे ॥
नीलवस्त्र तें नेसे यास्तव शशिमुख तन्मनिं खोंचे ॥ १४४ ॥

---

१ मंजुषी माता. २ श्रीपाल. ३ जाहजांत. ४ कठिण. ५ घनस्तन.

आत्मसुखातें खालीं करुनी मौनें बसली नारी ॥
तिचें सुरुपही ध्यानीं धरुनी झाला उत्सुक भारी ॥ १४५ ॥
मनीं ह्मणे मज काम नावरे तगमग जिव हा होतो ॥
चुंबन घेऊं मिठी घालुं कां ! त्रास ध्यास हा देतो ॥ १४६ ॥

शार्दूलविक्रीडित.

तन्वंगी[1] हरिणाक्षि[2] शेटजि मनीं मोहूनि रूपा स्मरे ॥
राहे मूर्ती तिची पुढें तळमळे संतापुनीयां स्मरें[3] ॥
लागे ध्यास कसा निशींदिनिं तया स्वप्नीं सदा घोळते ॥
काया शुष्कवि होय काय न सुचे चिंता मनीं जाळते ॥१४७॥
त्यातें दास ह्मणें अहो ढवळजी कां क्षीण काया अशी ॥
वक्तॉ[4] स्पष्ट तयास निंदुन वदे लज्जा नसे हो कशी ॥
राजाच्या ललनेवरी मन तुझें ही वासना दुष्टगा ॥
त्यागूनी विषयास मुक्तिसुख घे देवा जिनेशास गा ॥ १४८ ॥
वाटे भाष्य[5] कठोर टाकुन सुधा जैं मूर्ख प्राशी सुरा ॥
किंवा वीष तनूंत भीनुन कटू लागे मधूशर्करा ॥
तैसा कामुक होउनी त्यजुनियां सच्छास्त्रवाणी कुधी ॥
भृत्यातें पुसतों प्रिया ममकरीं ती प्राप्त होई कधी ॥ १४९ ॥

आर्या.

झुंजाया नचि शक्ती नरवर भूपाल त्यां बहु शक्ती ॥
यास्तव सागरिं बुडवूं सफला होईल ही बरी युक्ती ॥१५०॥

शिखरिणी.

वणिक् भृत्यादी ते सकळ जन पापी बहुकुधी ॥
नृपाला युक्तीनें बुडवुं ह्मणती ते जलनिधीं ॥
अहो आले [10]चांचे लवकरची धांवा ह्मणुनियां ॥
हका मारीती ते सकळ जन गेले भिउनियां ॥ १५१ ॥

---

१ मृदु शरीर जिचें ती. २ हारिणाप्रमाणें अक्ष (नेत्र) जिचे ती. ३ कामानें. ४ बोलणारा चाकर. ५भज. ६ बोलणें. ७अमृत. ८ दारू. ९ श्रीपाल. १० गलबत लुटणारे.

### आर्या.

फाल्गुन वार्दे कळविति आले हो दुष्ट दांडगे यानीं ॥
वधितील कीं वधावें अ[1]जसमुदायास लांडगे यांनीं ॥ १५२ ॥
घोरांबु[2]धीं बुडालों ऐसें वदुनी करीती रुदनातें ॥
श्रीपालातें ह्मणती घातचि हा घात तार दीनातें ॥ १५३ ॥

### साकी.

आक्रोशध्वनि कर्णीं परिसुनि भूपती सावध झाला ॥
चांचे समजुनी शासन करण्या स्तं[3]भावरतीं गेला ॥ १५४ ॥

### मालिनी.

लगबग करुनीयां दुष्ट त्या शेटजीचे ॥
अनु[4]चर धनलोभें छेदिती स्तंभ साचें ॥
कपटि ढवळशेटी भूप भाँ[5]वीक जाणा ॥
मनुज बुडवि त्यातें तारितो देवराणा ॥ १५५ ॥

### शार्दु० वि०

तारूच्या वरुनी पडे नरपती तो फार घोरांबुधीं ॥
दुःखाब्धींत पडे प्रिया तळमळे संताप पावे सु[6]धी ॥
मंत्रातें स्मरतांच दुःखसमयीं श्रीपाल भावें मनीं ॥
आलें काष्ठ तशांत त्यास धरुनी वांचीवला तो गुणी ॥१५६॥

### वसंततिलका.

रत्नाकरीं[7] मकर[8]ही बहु थोर मीनें[9] ॥
पुण्यप्रभावें[10] असतां बघतांचि लीन ॥
होतात क्रूर पशु हिंसक दुष्ट वैरी ॥
अ[11]स्पर्श पैल उतरे प्रभु सिंधुतीरीं ॥ १५७ ॥

---

१ मेंढरें. २ मोठ्या समुद्रांत. ३ जहाजाचें शीड, फरारा. ४ चाकर. ५ भोळा. ६ पतिव्रता. ७ समुद्रांतील. ८ सुसर. ९ मासे. १० पुण्याचा पराक्रम. ११ कांहीं इजा न होतां.

आर्या.

सिंधुतिरीं होतें कीं मोठें 'दलवर्धनाख्यें'[1] तें पूर ॥
शूरावतंस[2] राजा 'धनपालक' शत्रुशीं करी चूर ॥ १५८ ॥
संतति[3] संपत्तीशीं प्रचूर[4] असे पाळितो प्रजा सौख्यें ॥
पत्यनुगामी[5] साध्वी 'शीलवती' साजवी नृपा आख्यें[6] ॥१५९॥
तत्तनया[7] 'गुणमाला' वेल्हाळा चालली सवें ताता ॥
पत्यर्थी[8] लय ध्यानीं तैसी वंदीति सन्मुनी–नाथा ॥ १६० ॥
नृपतनयेतें पाहुनि आशीर्वादास दे मुनी–नाथ ॥
प्रियपति तोच[9] मिळेंदे एकाकीं जो तरे नदी–नाथं[10] ॥१६१॥

दिंड्या.

निधीतीरीं ठेविले दूत होते ॥
येउनीयां सांगति भूपतीतें ॥
अजी महाराजा, एक धैर्यशाली ॥
राव आला सिंधुच्या ऐलें[11] तीरीं ॥ १६२ ॥
महोत्साहें अणविला जलोत्तीर्ण[12] ॥
विधी लग्नाचा नेमियला तूर्ण ॥
जघन चपलांमधिं चपल गुणमाला ॥
त्वरित घाली श्रीपाळ गळां माळा ॥ १६३ ॥

आर्या.

आत्मस्वार्थी मानव पर घाता करुनि स्वार्थ इच्छितसे ॥
तारक अर्हत् असतां स्वार्थ न हो व्यर्थ अर्थ खर्चितसे ॥१६४॥

---

साक्या.

दुसरी स्त्री जी मदनमंजुषी बुडे कांतशोकांत ॥
प्राणपती तो घोर समुद्रीं पडतां करि आकांत ॥ १६५ ॥

---

१ गोवें अर्वाचीन नांव. २ वीरश्रेष्ठ. ३ लेंकरें. ४ पुष्कळ. ५ पतीवचनास मान देणारी. ६ नांवानें. ७ त्याची मुलगी (राजकन्या.) ८ पतीइच्छा. ९ श्रीपाल. १० समुद्र. ११ अलीकडे. १२ श्रीपाल. (जलांतून पार आलेला.)

हृदय पिटोनी घेती अबला नयनीं आश्रू गाळी ॥
धाय धाय ती रडे न कैशी स्वजनाविणे त्या काळीं ॥१६६॥
म्हणे जिनेंद्रा कसा आवडे नकळे घात विचार ॥
मी अबला हो कैसी साहूं बहु दुःखाचा भार ॥ १६७ ॥

दिंड्या.

पूर्वजन्मीं म्यां काय पाप केलें ॥
प्राणपति हे उदधींत बुडुन गेले ॥
कुठें पाहूं मी प्रिया जगत्पाळा ॥
कसें विपरित जाहलें हो कपाळा ॥ १६८ ॥
सगुणखाणी ममरत्न हरुनि नेलें ॥
ब्रह्मदेवानें हेंच लेखियेलें ॥
कुठुन बुद्धी जाहली जावयाची ॥
गती होणारी तशी व्हावयाची ॥ १६९ ॥
सुगुण अठवीतां हृदय फार पोळे ॥
नाथदुःखें भूवरी सदा लोळे ॥
अरे नाथा! मजविना गये कैसें ॥
ममत्वाचें दृढ सूत्र तोडिलेंसें ॥ १७० ॥
हाय हाय ही काय गती झाली ॥
कशी दुबळीला दूरदेशि केली ॥
अहा नाथा! त्रैलोक्य शून्य झालें ॥
नाहिं कारे तुजें आधि मरण आलें ॥ १७१ ॥
शशीविरहित आकाश तसें भाळ ॥
कसें दावूं स्वजनास, दुष्ट काळ ॥
जरी मरतां तरि दुःख कसें आहे ॥
हेंच कळतें जायेस तुझ्या पाहें ॥ १७२ ॥
कोण जन्मीं मी घोर पाप केलें ॥
जणो त्याचें हें दुःख फला आलें ॥

---

१ आश्ररहित. २ दुःखवाचक. ३ सामान्यरूप ( तुझ्या ).

दीन रजनीं मी दुःख किती साहूं ॥
स्वामि मत्प्रिय तो कुठें तरी पाहूं ॥ १७३ ॥
हृदय कातरतें ध्यानिं मूर्ति येतां ॥
हाय हायचि! हें नष्ट दुःख चित्ता ॥
व्यर्थ माझें हें जिणें हा कपाळा ॥
योग्य कृत्य हेंचकां? जगत्पाळा ॥ १७४ ॥
उचित दिसतें कीं काय तुझ्या न्याया ॥
किती सोसावें दुःख अशा ठायां ॥
शरण आलें मी दीन प्रभोराया ॥
तार अथवा मार तूं धरीं पाया ॥ १७५ ॥
दुष्ट वणिकाचें[1] कृत्य असें सारें ॥
जगीं खल हो वर्तती दुराचारें ॥
त्यजुनि लज्जा विषयांध धर्ममान ॥
हडी छी थू करि तरी वसे श्वानें[2] ॥ १७६ ॥
कर्मगतिनें हें कृत्य जिना[3] केलें ॥
जसें होणें तें होउनियां गेलें ॥
दोष नाहीं हा कुणाकडे कांहीं ॥
भाग्यहीना मी तूंच प्रभो पाहीं ॥ १७७ ॥
जिना देवेंद्रा रक्षि मला आतां ॥
घोर जलधींतुनि पार करी कांतां ॥
तूजवीणें भुवनांत नसे त्राता ॥
ह्मणुनि विनवीतें तुला जगन्नाथा ॥ १७८ ॥
विवेकांबूनें[4] क्लेशवन्हि[5] शांत ॥
स्वल्प होतां हृत्कमळिं[6] दीननाथ ॥
धरी लावी लयरूप सती ध्याती ॥
स्थीर मानस करुनियां शुद्धवृत्ती ॥ १७९ ॥

---

१ धवलशेटी. २ कुत्रें. ३ श्रीपालास. ४ विचाररूपीं उदक. ५ दुःखाग्नि. ६ अंतःकरणीं.

साकी.

मूढ ढवळजी नीति न ऐके सज्जन बहु जरि सांगे ॥
दुर्जन चित्तीं हेतु सदोदित दुष्कर्माचा वागे ॥ १८० ॥
सद्बोधाचें वच नचि ऐके जाणा तो अज्ञान ॥
सुधा त्यागुनी खल दुर्दैवी सुरा करीतो पान ॥ १८१ ॥
मी तुज तूं मज प्रियकर होऊं मेलें जें तें गेलें ॥
विविधा भोगा भोगूं आह्मी दुःख नसे सुख झालें ॥१८२॥

शार्दुल वि०

बोले जी मधुभाषणें करुनियां सिद्धांत शास्त्रोक्त ती ॥
आहें मी बहु पापभीरु ह्मणुनी सांगूं नको दुर्मती ॥
टाकाया मज पापकर्दमिं[1] बळें तूं हें मनीं इच्छिसी ॥
ठेवाया पद सर्पमस्तकिं मला ऐसें कसें बोलसी ॥ १८३ ॥
गेला कंत निधींमधें बुडुनियां आशा नको ही करूं ॥
घे हें द्रव्य अपार काय वदुं मी भीती नकोगे धरूं ॥
होई हो रमणी मनीं किमपिही आणूं नको राग गे ॥
सौख्या भोग सदा अमूल्य नंग[2] हे लेवून सौख्यास घे ॥१८४॥
कांतेला पति हेंच भूषण, नरा विद्या, निशे चंद्रिका, ॥
कूपा नीरच, जाण भूषण मही भूपाळ, कीं वाटिका ॥
मध्यें हीच तटाक भूषण दिसे, विद्येप्रती नम्रता ॥
पातिव्रत्यच कामिनीस[3], बरवें शोभे न सोनें वृथा ॥१८५॥

शु० का०.

वदुनियां असें मौन बैसली ॥
त्रिभुवनीं दिसे कामिनी भली ॥
बहुत संकटीं शील पाळुनी ॥
सतत आठवी ती जिना मनीं ॥ १८६ ॥
वणिक देखुनी रूप उग्र तें ॥
विषय स्निग्ध[4] हो चित्त व्यग्रतें ॥

---

१ चिखल. २ दागिने. ३ स्त्रियेस. ४ कामानें प्रेमयुक्त झालेलें.

नवल जाहलें वासना फिरे ॥
नमुनियां सती बोलला बरें ॥ १८७ ॥

आर्या.

ढवळ ह्मणे साध्वीला चित्तांतिल सर्व रोष सोडोनी ॥
माते रक्षि अह्मातें नम्रत्वें विनवि हात जोडोनी ॥ १८८ ॥
यत्नें घाव न चाले रत्नावर लोहशस्त्र भंगेल ॥
साध्वी सद्[1]व्रत त्यागुनी कुलटा बोलास काय गुंगेल ॥ १८९ ॥
त्वत्पति[3] मत्तातचि जो ह्या बाला माय हो सदा रक्षी ॥
बडबडलों अज्ञत्वें सुजणे माये अणूं नको लक्षीं ॥ १९० ॥

भुजंगप्रयात.

छळी शेटजी तो सतीलागि भारी ॥
अरु[2]ष्टा दयाळू अशी धन्य नारी ॥
जिनाधीश याला करी ती विनंती ॥
प्रभो तारिलें वाढलें पुण्य कीर्ती ॥ १९१ ॥

शा० वि०

देवी कोप त्यजूनियां मनिं धरी संतोषवृत्ती तदा ॥
जैसा चंदन घासतांहि बरवा सौगंध देतो सदा ॥
गाळीला चरकांत इक्षु तरि तो गोडीच दे ज्या परी ॥
किंवा कांचन फार तप्त करितां कांती चढे त्यावरी ॥१९२॥

वसंततिलका.

जे साधु सज्जन मनीं करितात भक्ती ॥
ते सौख्य पावुनी जनीं वरितात मुक्ती ॥
त्यांच्या मनांतिल मनोरथ पूर्ण होतो ॥
तैसा प्रसन्न जिननाथ सदैव होतो ॥ १९३ ॥
अर्हत्पदांबुजिं सदोदित चित्त ठेवी ॥
ध्याती लयें करुनि मंजुषिनाम देवी ॥
प्रार्थूनियां समयिं त्या ह्मणती जिनातें ॥
तारा प्रभो जलनिधींतुनियां जनांतें ॥ १९४ ॥

---

१ शुद्धधर्म. २ जारणी. ३ तुझा यजमान माझा बापच. ४ रागरहित.

आर्या.

तारू होउन स्थीरच सागरतीरास लागलें त्वरित ॥
तेव्हां नाविकजन ते चालति नगरास हर्ष बहु भरित ॥ १९५ ॥
ज्या नगरीं मंजुषि पति त्या नगरालाच शेटजी आला ॥
बहु भूषणें सुरत्नें घे भेटिस राजमंदिरीं गेला ॥ १९६ ॥
चित्रविचित्र पदार्थें नृपवर्या तोषवी वणिक् पुत्र ॥
श्रीपालातें देखुनि मनिं जळतो हा कसा आला अत्र[1] ॥ १९७ ॥
नृपवर्यें सन्मानें आनंदें ढवळशेट बोळविला ॥
श्रीपाळरूपि चिंतें तो गर्वी ढवळशेट लोळविला ॥ १९८ ॥
कोटीभट[2] जलधींतुनि वांचुनियां येथ हो कसा आला ॥
पत्नी छळ त्यां कळतां मजवर येईल मृत्युचा घाला ॥ १९९ ॥
यास्तव कपटी कपटें योजी करण्यास कीं तदपमान ॥
हित साधाया इच्छी निर्दय जन जेंवि कापण्या मान ॥ २०० ॥
बहुरूंप्यासी[3] देउन वित्त बहू सांगतों करा काम ॥
दुर्घट कर्महि जातें त्वरितचि सिद्धीस खर्चितां दाम ॥ २०१ ॥

भुजंग प्र०

बहूरूपि ते राजवाड्यांत गेले ॥
अनेका कला पाहुनी तुष्ट झाले ॥
वदे भूप तो वित्त द्या यां श्रिपाळा ॥
अलंकार वस्त्रें दिल्या रत्न माळा ॥ २०२ ॥

शा० वि०

त्या काळीं बहुरूपि ते वदति त्या श्रीपाळ राजाप्रती ॥
पुत्रा[4] आजवरी अम्हां न दिससी चिंता हरें सांप्रती ॥
खाण्याची कळि काढुनी झगडुनि सिंधूंत गेलास[5] रे ॥
बाळा येथ कसा निधी तरुनियां वांचून आलास रे ॥ २०३ ॥

आर्या.

ऐसीं अभद्र[6] वचनें ऐकुनि दुःखीत राय घाबरला ॥

---

१ एथें. २ श्रीपालास कोटीभट अशी संज्ञा होती. ३ अनेक रूपें धारक. ४ संबोधन अपमानकारक. ५ भूतकाळ. ६ अकल्याणकारक.

अक्षत्रिय[1] भूपालचि संशय ऐसाच मानसीं भरला ॥ २०४ ॥

मालिनी.

ठकवुनि वरिली ही कन्यका श्रेष्ठ माजी ॥
कवण कुटिल मातें दुःख देई खरा जी ॥
धरुनि कपट रूपाऽनेक रूपी खराची ॥
ह्मणुन वध करारे भीड कां ह्या खरांची[2] ॥ २०५ ॥

पद.

( उद्धवा शांतवनकरजा इ० चालीवर )

ही वार्ता ऐकुनि त्याची ॥ गुणमाळा दुःखित होती ॥ धृ० ॥ मत्प्राणविसाव्यावरती, ही आळ कशी हो आली ॥ दुःखाची हृदयीं भरती, येउनियां सन्निध गेली ॥ नेत्रांतुनि अश्रू गळती, सखयातें पुसती झाली ॥ चाल ॥ आपुलें चरित सांगावें, मत्तातचित्तिं वागावें, हें वचन माझें ऐकावें, दूर करावी भ्रांती ॥ ही वार्ता० ॥ १ ॥ ऐकुनी सती वचनातें, भूपति हा बोले पाही ॥ बहुरूपी वच हें सत्य वाटल्या उपाय नाहीं ॥ कर्माचें फळ गे कांते दोष हा कुणावर कायी ॥ चाल ॥ जें पाप असें पूर्वीचें, हें संकट बीजहि त्याचें, काय मी वदूं या वाचे, रडूं नको उगी, धर शांती ॥ ही वार्ता० ॥ २ ॥ गजगमने, पुससी कथितों, श्रवणातें करि तूं कांते ॥ हें सत्य ऐक गे साध्वी, सागरांत मौक्तिक होतें ॥ मी राजा कीं बहुरूपी, माहित हें मंजूषीतें ॥ चा० ॥ ती प्राणवल्लभा कोठें, विपरित हें होतें मोठें; भाविलें सर्वच खोटें, सांपडलों परक्या हातीं ॥ ही वार्ता ऐकुन त्याची ॥ गुणमाळा दुःखित होती ॥ ३ ॥ २०६ ॥

मालिनी.

कमलवदन साध्वी मजुंषीनें वरीलें ॥
सहज उभयतांही तारवासीं वरीलें ॥
गमन करुनि मध्यें पातलों सागराच्या ॥
चढुन दुरुन देखे स्तंभिं त्या गे शिडाच्या ॥ २०७ ॥

---

१ राजकुलीं न झालेला. २ गाढवाची.

ढवळ ह्मणुन शेटी तारवीं मुख्य होता ॥
प्रबळ कपट त्याचें कोण जाणील ज्ञाता ॥
अवचित कपट्यानें तोडिला खांब साचा ॥
जलधिंत पडलों कीं वांचलों एकदांचा ॥ २०८ ॥

आर्या.

साक्षात् गुणमाला जी गेली तत्काळ कळवि वृत्त पित्या ॥
नांव 'ढवळजी' परिसुनि स्मरणीं येतांचि रोष ये कुपि[1] त्या २०९
सत्वर दूता प्रेरुनी घेरूनि गांठिलेंचि जल तीर ॥
शेटीचे जन जेथें होते त्यां दाविलेंचि दरबार[2] ॥ २१० ॥
त्या जनसमुहीं होती मंजूषी प्राणरक्षका पतिचे ॥
नृपवर्यें ती देखुनी सन्मानें पुसत वृत्त सर्व तिचें ॥ २११ ॥

इंद्रवज्रा.

रत्नाप्रती मोल नसेचि कोठें ॥
त्या गारगोटी ह्मणतात खोटें ॥
चिंतामणी मूल्य अपार आहे ॥
तें पारख्यावीण दुजा न चाहे ॥ २१२ ॥
ती मंजुषी बोलतसे सुवाचे ॥
हा कांत केवी जलधींत वांचे ॥
अर्हज्जिना वांचविला पतीही ॥
श्रीपाल राजा नमित्ये सती ही ॥ २१३ ॥

आर्या.

सत्यार्थ[3] जाणुनीयां रायें शेटास अणविलें सदसीं[4] ॥
बहुरूप्यासहि अणवी शिक्षार्थी चमकुं लागल्या सदसी[5] ॥ २१४ ॥
श्रीपाल ह्मणे राजा दुष्टानें दुष्ट कृत्य जरि केलें ॥
दंडूं[6] नयेचि सुज्ञें मुक्त करा, सोडवा असें बोले ॥ २१५ ॥
आत्मा उदार पाहुनि नृपवर्यें मुक्त शेटजी केला ॥
कीं ज्या योगें शेटी दिसला सकळांसि हा जणो मेला ॥ २१६ ॥

---

१ आधींच रागावलेला. २ कचेरींत आणिलें. ३ खरेपणा. ४ सभेंत. ५ चांगल्या तरवारी. ६ शिक्षा करूं नये.

राजा बहुरूप्यासीं दासांकरवीं उदंड दंड करी ॥
भंडकुभांडहि थंडचि होतां शांती सभेप्रतीहि वरी ॥ २१७ ॥
होतां मुक्तचि शेटी नगरा जायास कृष्णमुख[1] झाला ॥
घोर समुद्रीं जातां तारूं बुडलें मरोनि तो गेला ॥ २१८ ॥

पृथ्वी.

कसा ढवळशेटजी सुगति नाश तो पावला ॥
मरोनि रवरौ[2] तया अहह दुष्ट तो लाधला ॥
रतीसुख अती लघू कुठुनि प्राप्त ? भर्ती किती ॥
नसे विषय हा बरा ह्मणुनियां कवी टाकिती ॥२१९॥
दयालु वसुधापती[3] सुख घडे न बाधा तया ॥
अगाध महिमा जयीं चरित हें जगीं गावया ॥
शिलासम दुजें नसे व्रत करी भवा पार हें ॥
तरंडकिं[4] बसोनियां बहुत जाति ते पार हे ॥ २२० ॥
जसें सुकृत हो तशी घडतसे स्थिती मानवा ॥
विलोकुनि स्थिती जगीं करिति ते अती मान वा ॥
उपेक्षिती ह्मणोनियां सुकृत जोडिती साधु हो ॥
सदैव यश पावण्या पटसमा[5] मनांत धुवो ॥ २२१ ॥
सुशील व्रत भूप तो सतत आदरें पाळुनी ॥
वसे त्रिभुवनीं गुणी धवल कीर्ति तो पाउनी ॥
नतावन करूनियां सुरभिवत्[6] जना तोषवी ॥
सुपुत्र सम तो प्रजावन करी सदा शांति वी ॥ २२२ ॥

आर्या.

सिंहासनीं विभू तो आनंदें बैसलाचि एक दिनीं ॥
सांगे सुरम्य वाणी मधुर कथा वैश्य एक येवोनी ॥ २२३ ॥

दिंड्या.

वैश्य सांगे भो नृपति ऐक मात ॥

---

१ काळें तोंड. २ नरकवास. ३ श्रीपाल. ४ नांव. ५ वस्त्राप्रमाणें.
६ कामधेनु.

पूर कुंडलिंचा राव मकर केत ॥
सती शोभे कर्पूरतिलक नांवें ॥
पांच पुत्र तिजप्रती असें ठावें ॥ २२४ ॥
कला विद्या चातुर्य धर्मवंता ॥
रूपवंती कन्यका फार शांता ॥
चित्रसेना आणीक कमलनेत्रा ॥
सुगुण खाणी बिसतंतु मृदू गात्रा ॥ २२५ ॥

शिखरिणी.

विणानादापेक्षां रुचिकर तसा मोहित कर ॥
सुधेला धिःकारी वचसम करी काय इतर ॥
मदीया चित्तातें रमवि मधुरालाप करुनि ॥
तदीया गानाची ध्वनि परिसुनी तृप्ति श्रवणीं ॥२२६॥

शा० वि०

कन्या त्या चतुरा बहूत पढल्या गंधर्वविद्ये प्रती ॥
आम्हाला हरवील गान करुनी त्यांतें वरूं बोलती ॥
ऐशा त्या नृपकन्यका गुणवती दीर्घा प्रतिज्ञा करी ॥
मातें जी गमतें पणास हरण्या तूं धन्य या भूवरी ॥२२७॥

पृथ्वीछंद.

यशाचल निघोनि त्या नगरिं पातला सत्वरें ॥
करोनि मधुगायना हरुनि घे प्रियांसत्व रे ॥
करें सुचिर घातली रुचिर मालिका कंठिं ती ॥
विवाह विविधाविधी करुनि तोषिला भूपती ॥२२८॥

शा० वि०

कोणी एक दिनीं नृपाल सदसीं बैसे तदा दूत ये ॥
बोले कांचनपट्टनीं नृप गुणी सेनाख्य नांदे नयें ॥
राज्ञी कांचनमालिका तनय तो गंधर्व सेनाख्य गा ॥
त्याला शंभर कन्यका गुणवती तैशा न हो या जगां॥२२९॥

---

१ कमलतंतू. २ गोड भाषण. ३ गायनकला. ४ अवघड. ५ पण जिंकला. ६ नगर.

### दिंडी.

एक दिवशीं सेनाख्य मुनीपाद–॥
पद्म वंदी मुनि वदे सौख्ये–वाद ॥
मकरकेताच्या दोन्हि कन्यकेचा ॥
तुझ्या नंदिनिला तोचि[2] कांत साचा ॥ २३० ॥

### इंद्रवज्रा.

त्यानें नृपा पाठविलें मला हो ॥
आतां चलाहो सुयशाचला[3] हो ॥
ऐकूनि ऐसें प्रभु चालिला हो ॥
येतां बहो[4] नागरिकास लाहो ॥ २३१ ॥

### साक्या.

लग्नविधी तो सुपूर्त होतां नगरा प्रभु सोडोनी ॥
मार्गी जातां सुज्ञ दूत ये सांगे कर जोडोनी ॥ २३२ ॥
ह्मणे नरेंद्रा कोंकण प्रांतीं विजयसेन नृप आहे ॥
सोमप्रभा ती त्याची जाया भुवनिं ऐसि न पाहे ॥ २३३ ॥

### शा० वि०

राजा तो रूपयूनं[5] सुंदर तसा चौऱ्यांशि कांतारम[6] ॥
त्याचे पुत्र हिरण्यवर्म पहिला, सिंहाल, युद्धोत्तम ॥
चौथा तो सुजितारि कृष्ण तनया सोळा शतें सुंदरी ॥
त्यामध्यें वसुसंख्य[7] नंदिनि गुणी त्यांहीं प्रतिज्ञावरी ॥२३४॥

### श्लोक.

गजगमा[9] वदती पद येक हो ॥
ह्मणति तीन पदें कर सांग[10] हो ॥

---

१ शुभवृत. २ श्रीपाल. ३ मेरूवत् धैर्याचा. ४ फार. ५ तरूण.
६ चौऱ्यांशी कांता भोगणारा. ७ आठ. ८ भूतकाळ. ९ कन्यका. १० पूर्ण.

करुनि छंद पुरा पण जिंकितां ॥
पति वरूं नृपती ह्मणती सुता ॥ २३५ ॥

शार्दूलविक्रीडित.

वारीजाक्ष असें करोनि श्रुत तो आला त्वरेनें पुरीं ॥
भेटोनी वसुधापतीस ह्मणतो कन्या प्रतिज्ञा पुरी–॥
सांगाया श्रुति उत्सुका असति कीं श्रीपाल बोले यदा ॥
रायाच्या वसुसंख्य नंदिनि मनीं हर्षान्विता हो तदा ॥२३६॥

ओंव्या.

सौभाग्य गौरी पहिली ही ॥ शृंगार गौरी दुसरी पाही ॥
पाली, सोमा, चित्रलेखा, संपदाही ॥ योरणा ही सातवी ॥२३७॥
पद्मावती ह्या अष्ट कन्या ॥ वरितील कैशा विगुण अन्या ॥
रूपें गुणें श्रेष्ठ धन्या ॥ प्रश्नोत्तरें परिसिजे ॥ २३८ ॥

शा० वि०

बाले, एकचि रम्य पाद रचुनी सांगें वदे भूपती ॥
भावार्थासहि लक्षुनी जणु गमो एका कवीची कृती ॥
ऐशी ती रसिका करी सुकविता सौभाग्य गौरी वदे ॥
" भोगी शाश्वत कोण? थोर पदवी बाधा न राहे मुदें"॥२३९॥

मालिनी.

वसुमतिपति ऐके तेधवां एक पाद ॥
वरवधु वरण्याचा लागुनी त्यास नाद ॥
मनन करुनि ध्यानीं बोलतो कीं रचोनी ॥
पुरित करुनि सांगे भूपती पाद तीनी ॥ २४० ॥

शा०वि०

रक्षी जो सुकृतादि सत्य शुचि हीं तत्वें धरी अंतरीं ॥

---

१ श्रीपाल. २ आठ. ३ आनंदानें. ४ श्रीपाल. ५ श्रेष्ठ नवरी. ६ शुद्धपणा.

पाहे ब्रह्मरुपास होइ न तया लक्ष्मीहि कां किंकरी[1] ॥
वारंवार विलोकिती, सुरपुरीं[2] रामा[3] तया हाक दे ॥
भोगी शाश्वत फार थोर पदवी बाधा न राहे मुदें ॥ २४१ ॥

शा० वि०

शृंगारी सुदती तदैव वदती वाणी द्वितीया मधु ॥
ज्ञानी शास्त्र–विशारदा[4] गुणवती प्रेम्णा[5] शमीते[6] विधूं[7] ॥
सांगे पाद सती, पुढील चरणीं योजूनि मातें वरा ॥
जातां वित्तहि चित्त नित्य असतां कां पित्त घेरी नरा ॥२४२॥
पद्मीं[8] भृंगें[9] तसाचि लुब्ध बरवा जो जीर्ण, द्रव्याप्रती ॥
ठेवी लक्ष सदा अधर्मचि[10] करी तोही स्वतां ना वरी ॥
वायां दंड भरी द्युतीं[11] पर हरी, चोरी हरी पामरा ॥
जातां वित्तहि चित्त नित्य असतां तें पित्त घेरी नरा ॥२४३॥

वसंततिलका.

नीलांबुजाक्षि[12] वदते युवती सुवाक्यें ॥
धर्मेंचि सर्व मिळती मनुजास सौख्यें ॥
ऐसें कळोनि रतली[13] जिनधर्मि नारी ॥
बोले पिता कवण तो असुखा[14] निवारी ॥ २४४ ॥
श्रीपाळराज वदतो रचुनी त्रिपादीं ॥
हे सुंदरी, जननमृत्युजरा त्रिपादीं[15] ॥
रक्षोनि, शास्त्र पढवी जिनध्यास भारी ॥
बोले पिता मधुर हा असुखा निवारी ॥ २४५ ॥
जिंकोनि आजि पण हा मजला वरावें ॥
पाहा पदार्थ सकलें मनिं त्वां धरावें ॥
राजा पुढील चरणीं मज सांग स्पष्ट ॥
पंचाननासम[16] असा जगिं कोण श्रेष्ठ ॥ २४६ ॥

---

१ दासी. २ स्वर्गांतील. ३ स्त्रिया. ४ जाणती. ५ प्रीतिनें युक्त. ६ शांत. ७ चंद्र. ८ कमलांत. ९ भोंगे. १० लोभी. ११ जुगारांत. १२ तिसरी कन्या. १३ भजली. १४ दुःखास. १५ जन्म मृत्यु ज्ञातारपणीं. १६ अमींत. १७ सिंहासारखा.

सर्वांपरी गुणशिलास जडोन राहे ॥
जो कां सदोदित व्रतादि जिनास पाहे ॥
पूजा त्रिकाल करि नेम उपास कष्ट ॥
पंचाननासम असे जगीं तोच श्रेष्ठ ॥ २४७ ॥
ती पांचवी सुदयिता[1] ह्मणती नृपाला ॥
सांगा मला चरण तीन प्रभो कृपाला ॥
आशा हि पूरित करा न उरोचि ओळे ॥
उत्कृष्टधर्म? वरितां सुख तें उमाळे ॥ २४८ ॥
ऐकें प्रिये, मथित अर्थ[2] तुला कथीतों ॥
हिंसत्व ना करि सदा जिन जो धरी तो ॥
तो विश्ववंद्य गमतो रततां सुकाळें[3] ॥
उत्कृष्ट धर्म वरितां सुख हें उमाळे ॥ २४९ ॥

शा० वि०

जोडोनी कर ती ह्मणे सुरपती माझी प्रतिज्ञा पुरी ॥
कर्ता तूंच, ममस्वसा[4] सम अजी गाजी करा या धरी, ॥
रूपें सुंदर कांतियुक्त युत तूं विद्यागुणांहीं वरी, ॥
सृष्टीं श्रेष्ठ असा असे सुर[5] जसा तो कोण? या भूवरी ॥२५०॥
सांगे भूमिपती तदा सुदयिते जो आत्मतत्वा वरी ॥
होई तल्लीन रूप तें बघुनियां सद्भाव चित्तीं धरी ॥
तत्वातत्व विचार भंगुर क्षिणें मानीतसे अंतरीं ॥
सृष्टीं श्रेष्ठ असा असे सुर जसा तो हाच या भूवरी ॥२५१॥
हे राजा मजला सुछंद रचुनी सांगा ह्मणे तेधवां ॥
तूह्मां घेइन सत्य मी करुनियां जिंका पणातें धवा[6] ॥
विद्यारूप तशीच कल्पक सुधी[7] पद्मावती बोलती ॥
धात्रीं[8]माजि सजीव कोण? बघुनी माना जया डोलती ॥२५२॥
सिद्धांताऽगम सत्य नित्य समजे जो दानधर्मीं बळी ॥

---

१ प्रिया. २ हेतु. ३ चांगल्या वेळेनें. ४ माझ्या वाहिणीप्रमाणें. ५ देवेंद्र. ६ पती. ७ थोर कल्पनेच्या बुद्धीची. ८ पृथ्वीवर.

सामाईक[1] त्रिकाळ आठवि तपा ज्ञानीं कदा ना चळी ॥
तैसाची दर्शी[2] धर्म मर्म समजे आत्मस्वरूपाप्रती ॥
धात्रीं माजि सजीव तोच सखये माना तया डोलती ॥२५३॥

पृथ्वी.

मदीय पण जिंकितां यश अपार होई नृपा ॥
असे धवल कीर्ति ही ह्मणुनि राजया जी जपा ॥
ह्मणे चरण तीन ते करुनि पूर्त आधी वदा ॥
तपादि वरितां सुखादि न मिळे कसें ? हें कदा ॥ २५४॥
नुपेक्षुनि जपा तपा करि लघुवयीं[3] सत्वरें ॥
उमेद तनुची असे तवर साधते गे बरें ॥
जरीतरि[4] युवती सवें करुनि लग्न दुःखें तदा ॥
तपादि वरितां सुखादि न मिळे असें हें सदा ॥ २५५ ॥

आर्या.

जय पावला नरेश्वर अष्ट सुतांच्या पणास जिंकूनि ॥
कोणी नसेचि क्षोणीं[5] जन वदती भूप कीर्तिची खाणी॥२५६॥

शा० वि०

सद्भावें विजयाख्य–सेनप्रभुनें कन्या शता सुंदरी ॥
देवोनी करि तोचि लग्नविधि तैं हर्षोनियां अंतरीं ॥
रत्नांचीं बहु तोरणें झळकती त्या मांडवीं दाटती ॥
शोभे ती गगनीं दिसे भगणं[6] तैं दीप्ती अति फांकती ॥ २५७ ॥

सवाई.

दाटुनि वाट नसे जन थाटुनि पाहती लग्नविधी नरनारी ॥
षोडश शतयुवती[7] मधिं भूप दिसे शित भानु रुचीरहि भारी ॥
वेष्टुनि अष्टसुता ग्रहचक्रेंचि[9] नक्षेरं[10] भासचि होय जनातें ॥
शोभत[8] मंडपिं राय असा हा तोषुनि वर्णिती सर्व नृपातें ॥२५८॥

---

१ त्रिकाळ ह्मणण्याचें स्तोत्र. २ निबंध पहा. ३ लहान वयांत. ४ ह्मातारपणीं. ५ पृथ्वीवर. ६ नक्षत्रें. ७ सोळा हजार बायकांत. ८ सुशोभित. ९ ग्रहमंडळाप्रमाणें. १० नक्षत्र.

दिंड्या.

बहुत हौसेनें लग्न थोर झालें ॥
पूर सारें तें गजबजूनि गेलें ॥
ह्मणती राजा हा धन्य पुण्यप्राणी ॥
यशोनिधि हा बोलती लोक वाणी ॥ २५९ ॥
पंडितांचेही अदर मान झाले ॥
रंक लोकां श्रीमंत बहू केलें ॥
याचकांची मंडळी तीहि धाली ॥
कामधेनूही ह्मणति येथ आली ॥ २६० ॥
विजयसेनाला हर्ष बहू झाला ॥
दिलें आंदण फारचि जांवयाला ॥
रत्न कांचनही मूल्य वस्तु खासी ॥
अश्वरथगजवस्त्रादि दासदासी ॥ २६१ ॥
मध्य देशांतुनि भूप तो निघाला ॥
त्वरें दुलवर्धनपत्तनासि गेला ॥
तया सामोरा धनपाल प्रभू येई ॥
महोत्साहें नगरास शीघ्र नेई ॥ २६२ ॥

वसंततिलका.

नीलांबुजाक्षि युवती वरि राहुनीयां ॥
मोहीत होति न कशा नृप पाहुनीयां ॥
हा कांत एकचि असे ललेना[२] किती या ॥
हा चंद्र कीं गगनिंचा उतरे महीं या ॥ २६३ ॥
सुरूप नरपतीला दृष्ट लागेल बाई ॥
मदनसम शशीला तारका ह्याच काई ॥
ह्मणुनि कितिक बोटें लाविती गल्ल[३]-देशी ॥
हळूचि मुरुनि दृष्टी पाहती त्या प्रभूशीं ॥ २६४ ॥

दिंड्या.

तरुण आंगीं[१] वास्तव्य करुनि राहे ॥

१ गोर्वे. २ लाडक्या स्त्रिया. ३ गालावर बोटें मोडणें.

जणों वाटे हा दुजा मदन आहे ॥
क्वचित हांसुनि गालांत गोड वाचे ॥
विनययुक्तचि बोलणें त्या नृपाचें ॥ २६५ ॥
राय बोले कीं नृपति पुण्यमूर्ति ॥
नसे भुवनीं या तूजसमा कीर्ती ॥
उदय पावे हो सुकृतसूर्य राया ॥
सुखें राहा जी सर्व सहितें[1] जाया ॥ २६६॥
राव राहे दलवर्धपट्टनांत[2] ॥
मंजुषीही शोभते सदनांत ॥
पुण्यवंताचा पाय जेथ लागे ॥
कीर्ति धर्महि येतसे मागो मागें ॥ २६७ ॥

शा० वि०

बुद्धि शाश्वत ती असा नर नसे सृष्टीवरी एकही ॥
दारिद्र्यांत धजावणार कुठला शोधा विचारें मही ॥
इष्टां[3] संकटिं वांच्छिती मग पुढें त्याची स्मृती ना नरा ॥
ऐशाची गणना पशूमधिं करा त्या निर्दया पामरा ॥ २६८ ॥

आर्या.

प्रिय वस्तु दूर होतां तीचा जडतो अती मनीं प्रेम ॥
होते उत्सुकता बहु दृष्टपथीं[4] प्राप्त हो सदा काम[5] ॥ २६९ ॥
उज्जनिनगरीं होत्या माता कमळावती सती जाया ॥
राया पाहायाची उत्कंठा होउनी निघे जाया ॥ २७० ॥

मालिनी.

जनपर्दि[6] झणि जावे माळवा उज्जनीला ॥
म्हणुनि कटक[8] केलें सिद्धही त्याचि वेळां[7] ॥
सकल सुशिल कांता आपुल्या घेई संगें ॥
बहु गज रथ वाजी मार्ग चाले सुरंगें[9] ॥ २७१ ॥

---

१ स्त्रियांसहित. २ नगरांत. ३ मित्रांस. ४ दृष्टीपुढें. ५ इच्छा. ६ देशाला. ७ लवकर. ८ सेना. ९ आनंदानें.

आर्या.

मार्ग क्रमितां राजा तन्मार्गी पुण्यवंत गिरि लागे ॥
श्री नेमिनाथ मूर्ती पाहुनियां भूपती मनीं मागे ॥ २७२ ॥
पूजा स्तवन सुभावें अष्ट प्रकारें करीतसे भक्ती ॥
जो आत्मरूप पाहे होउनियां लीन त्यास हो मुक्ती ॥ २७३ ॥
याचकजनास तोषवि देउनियां वित्त हो बहू दान ॥
मेघ जसा कृषिलोगीं पाडुनि जल तो करी समाधान ॥२७४॥
करितां गमन पुढें तों आल्या सुरुपींहि पंचशत बाला ॥
प्रणिपात करी राजा उदधीं घेई जसा नद्या यांला ॥ २७५ ॥
तीर्थंकर पदवी ज्या शोभे कीं शांतिनाथ नाम सदा ॥
मार्गी विलोकुनीयां आनंदें वंदितोचि भूप पदा ॥ २७६ ॥
गमन करूनी जातां पाहे अरिष्टवपूर वाटेला ॥
अरिदमन भूप युद्धा सिद्धचि होऊनि तेधवां ठेला ॥ २७७ ॥
हस्ती आला मस्ती शूराग्रणि वधिल कां पशू राजा ॥
भूप ह्मणें अरिराया नच झगडूं मजसवेंचि शूरा जा ॥२७८॥
मूर्खास बोध तैसा दुर्भाग्याला बरी गमे हानी ॥
रोग्यास पथ्य न रुचे पय घृत त्यजि नष्ट तो सुरापानी॥२७९॥

शा० वि०

नारी जी मदनावली स्वमतिनें पाहोनि राजा वरी ॥
तो हा भूप अरीदमाख्य समजा श्रीपाल त्यातें हरी ॥
होती सर्वचि लीन त्या वनपशू पंचाननाच्या पुढें ॥
हस्तीही भिउनी पळे मग तिथें व्याघ्रादि हे बापुडें ॥ २८० ॥

आर्या.

रणिं उग्ररूप पाहुनि अरिदम राजा क्षणामधें भ्याला ॥
हरिरव श्रवण करोनि मत्त करी कीं अजाहि व्याघ्राला ॥२८१॥
अरिदम अधैर्य पळतो नागाला भेक हा जसा पळतो ॥
किंवा वृश्चिक पल्ली न्यायानें दूर हो जसा वळतो ॥ २८२ ॥

---

१ तोषला. २ शेताला. ३ स्वीकारी. ४ अहिछित नगर. ५ शूराग्रणी ह्म० वीरश्रेष्ठ.

भेंं गुप्त वसे नृप वनिं तेथें मुनिनाथ हा तपःशील ॥
अब्द द्वादश तप करि शम दम पाहूनि योग्य तर्गेशील ॥२८३॥

साक्या.

धर्म त्रिभूषण मुनिपाशीं तो दीक्षा घेई राजा ॥
प्रापंचाचा भारहि टाकुनि साधितसे निजकाजा ॥ २८४ ॥
खरा सुखी या भुवनिं नसे कीं दुःखित दिसती सारे ॥
तोच सुखी जो जिनपादाब्जीं तल्लिन होय विचारें ॥ २८५ ॥
सकल क्षणिक हें दिसे पलाचा नाचि भरंवसा कांहीं ॥
मृत्यूच्या हे स्वाधिन सारे कोण कुणाचा नाहीं ॥ २८६ ॥
राज्य कुणाचें धन सुत दारा बाप कुणाचा कोण ? ॥
एकचि प्राणी जन्मा येतो मरतो तोची जाण ॥ २८७ ॥

साकी ( त्रिभाषा ).

देखोजी ती सुंदर हुडगी मेयाग तारुण्य आया ॥
आंखे मृगकी चंचल कंण्णलें मज्जलें विलोकन कीया ॥ २८८ ॥

साकी ( कानडी. )

स्वर्गदल्लि रंभा रुपवती अकी परी इकि नारी ॥
कण्णमृग यदि नोडिनाचतांव मृग किर गजयू भारी ॥ २८९ ॥
हांग रुप हागि गुण आकेवा काणतावलु भाळा ॥
विद्यावंती आकी मुंद इल् सरस्वते हाताळा ॥ २९० ॥
जिनपद दल्लीं, श्रद्धा इट्टु कुंताळो अकिनारी ॥
याव मंडळेश्वर बंदा व्हाद्यन आवन द्वारी ॥ २९१ ॥
आकंप तनुजा नोड ।
भूपा अकंप तनुजा नोड ॥ धृ० ॥

शार्दूलवि०

पाहे भूप अशी सुरूप सुगुणा सद्धर्म भक्ती शिला ॥
आकंपा तनुजा म्हणून मग तो देशाप्रती चालला ॥

---

१ भिऊन. २ राहशील. ३ चंचल शरीर.

योषांसंघ[1] सर्व चमू[2] सकळही घेऊन जाया पुरीं ॥
वाटे चंद्र नभोगणीं सुरगणीं इंद्रादिकांच्या परी ॥ २९२ ॥
आकाशीं ग्रह हे तशा चमकती त्या तारका भोंवतीं ॥
त्यांमध्यें विधु तो प्रकाशयुत जो शोभा नभा देत ती ॥
त्यां माजीं ग्रह अष्ट रम्य ललना ती सुंदरी रोहिणी ॥
भेटूं आजदिनीं ह्मणोनि नृपती चाले त्वरें उज्जनी ॥ २९३ ॥

इंद्रवज्रा.

श्रीपाल बोले अजि रात्र जाया ॥
होईल तैशांच सर्वेचि जाया ॥
या कारणें एथ स्त्रियादि सारे ॥
ठेवूं ह्मणे स्वस्थ तुह्मी असारे ॥ २९४ ॥
पाहीन केव्हां ललनाहि माता ॥
होई अशी उत्सुकताचि चित्ता ॥
येथूनि आहे उजनी समीप ॥
जातों कथी सर्व जनांस भूप ॥ २९५ ॥
ऐसें वदोनी सकळां अधीरां[3] ॥
थारा खरा नाचि गमे सुदारां ॥
एथें कशा राहति[4] हे उदारा ॥
सन्नीध राहूं प्रियें[5]-सु-प्रवीरा ॥ २९६ ॥
जी प्राणनाथा उदयीक जाऊं ॥
जातां तरी सर्व सवेंच येऊं ॥
ऐसें स्त्रिया बोलति कीं नृपाला ॥
अंधारिं या जाउं नये कृपाला ॥ २९७ ॥
श्रीपालाचें चित्त आकर्षुनीयां ॥
प्रेमार्द्रें[6] तें बावरें होउनियां ॥
माता कांता दीसती काय दृष्टीं ॥
तेव्हां होई मानसीं शीघ्र कष्टी ॥ २९८ ॥

---

१ स्त्रीसमुदाय. २ सेना. ३ अबलांस. ४ आह्मी स्त्रिया हा कर्ता. ५ हे जिवलग वीरश्रेष्ठा श्रीपाला. ६ स्त्रियांचे प्रेमानें पाघळल्यानें.

उत्साहानें उज्जनी राजगेहीं ॥
रात्रींमध्यें सोबती त्यांत नाहीं ॥
जाया राया एकला तो निघाला ॥
मोहाचा तो नित्य ऐसाच घाला ॥ २९९ ॥

आर्या.

कुळ सावकार यांना स्मर्त्य[1] जसा 'वायदा' तसा हा कीं ॥
राजा राज्ञी यांतें स्मृति योग्यचि ह्मणुनि मार्ग हा लोकीं ॥३००॥
मूर्खवचा त्यागुनियां आत्मसमेंचि[2] करिति योग्य पंडित जे ॥
तैसें स्त्री वच त्यागुनि ये सत्वर जेथ अंबिकाहि[3] निजे ॥३०१॥

मंदाक्रांता.

माता कांता बोलती मंदिरांत ॥
बाई झाली आजि वो फार रात ॥
अद्यापी ते कां न येती घरास ॥
सासूबाई वायदा होय खास ॥ ३०२ ॥
पती कां न येती सरे वायदा हा ॥
वियोगानळें झोंबतो काय दाहा[4] ॥
कशी विस्मृती जाहली प्राणनाथा ॥
किती दुःख हें सोसवेनाचि आतां ॥ ३०३ ॥
वंदति कीं सुदती निघती जयीं ॥
लवकरी सुजने परतूं तयीं ॥
सुदत ही न चुके परि काय हो ॥
समय वेळ असा टळला किंहो ॥ ३०४ ॥

आर्या.

द्वारिं उभा श्रीपालजि चोरासम पाळतीस राहूनी ॥
शुद्धव्रता मां भार्या, देखुनि उत्सूक त्यास बाहूनी ॥ ३०५ ॥

श्लोक.

नरवर वच साध्वी पीयुषां तुल्य मानी ॥

---

१. स्मरण्यास योग्य. २ आपल्या मनाप्रमाणें. ३ माता. ४ काहसी.
५ पती श्रीपाल हा कर्ता. ६ माता. ७ हाक मारून. ८ अमृताप्रमाणें.

सकल विकल रोगा पाठवीलें विमांनीं ॥
उघडुनि नयनें ती जेधवां नाथ लक्षी ॥
परम मुदित ऐशी पाहतो चंचलाक्षी ॥ ३०६ ॥
अगाई खरें कीं खरी हाक झाली ॥
मनीं मानुनीं धन्यता फार केली ॥
जिनाची कृती या जगीं कोण जाणे ॥
कशीं संकटें वारुनी शीघ्र येणें ॥ ३०७ ॥
तोयां[2] तृषार्त[3] बघतां मनिं हर्ष सांचे ॥
स्वात्यंबु[4] चातक, घनास मयूर नाचे ॥
वत्सास धेनु अथवा कृपणास द्रव्य ॥
पाहोनि कांत नलिनी मनिं हर्ष भव्य ॥ ३०८ ॥
रामा गळां पडुनियां जननीस भेटे ॥
आल्हाद माय न मनीं भुवनीं निघोटें ॥
प्रेमाश्रु नेत्रिं भरुनी बहु सद्गदीत ॥
प्रेमाचिया जणु गमे बुडले नदींत ॥ ३०९ ॥

दिंडी.

निवेदीतां नृपचरित उभयतांशीं ॥
हर्ष होउनियां ह्मणति पुण्यराशी ॥
सासुबाई वच भवत्[6]सत्य झालें ॥
पूर्वजन्मज[7] संचीत[8] उदय आलें ॥ ३१० ॥
मला तातानें कोडि पती केला ॥
प्राणनाथा जिंकाचि घातक्याला ॥
तदा बोले श्रीपाल वल्लभे तूं ॥
नको चित्तीं धरूं प्रिये दुष्ट हेतू ॥ ३११ ॥

आर्या.

लालन पालन केलें बापानें या बहूत उपकार ॥
स्पर्धा करितां त्याशीं होइल चित्तास फार अपकार ॥ ३१२ ॥

---

१ दूर. २ पाण्यास. ३ तान्हेला. ४ स्वाती नक्षत्राचा पाऊस. ५ जी. ६ तुमचें. ७ पूर्वार्जित. ८ पुण्य.

पोरें उपकार कराया देती धेनूहि खावुनी घांस ॥
तें दुग्ध सर्प प्राशुनि पालनकर्त्यास देइ ही त्रास ॥ ३१३ ॥
यास्तव तुज मी कथितों जननी जनका कदा न निंदावें ॥
उपकार स्मरुनीयां त्यांचें पदयुग[2] सदैव वंदावें ॥ ३१४ ॥
ऐशा मृदुवचनांनीं कांतेला शांतवोनियां राजा ॥
आला पूर्वस्थानीं तेथें होत्याचि सुंदरा भाजा ॥ ३१५ ॥
दूतास ह्मणे राजा जाउनियां उज्जनीस कळवावें ॥
प्रजापाल विभूचें सौजन्यें मानसास वळवावें ॥ ३१६ ॥
प्रभुची आज्ञा घेउनि दूत निघे सत्वरें जसा बाण ॥
उज्जयनी नगराप्रति येउनि नृपती पदीं करी नमन ॥ ३१७ ॥

दिंडी.

अजी नृपवर्या मात परीसावी ॥
वीरें[3] जामाता भेट सुखें द्यावी ॥
सुवार्ता मी श्रुत केलि भूपवर्या ॥
मानपानें भेट हो महा आर्या ॥ ३१८ ॥

आर्या.

सबळ सचिव घेउनि तो सामोरा चालला प्रजापाल ॥
श्रीपाल राव देखुनि हर्षे नर नारि घेति बहु चाल ॥ ३१९ ॥
जामातापाशीं ते राजादिक थोर थोर येति जन ॥
भेटूनि मनीं ह्मणती भूप असें शुद्ध कीर्तिचें सदन ॥ ३२० ॥
श्रीपाल राय तेव्हां करयुग जोडोनियां तयां विनवी ॥
ओळखिलें कीं नाहीं ऐशा शब्देंचि तो बहू खुणवी ॥ ३२१ ॥
ध्वनि परिसतांचि राजादिक यांनीं चतुर राव ओळखिला ॥
जामांतपुत्र तुल्याचि—विस्मर कैसा पडेल ओळखिला ॥ ३२२ ॥

दिंडी.

जगामाजीं जयवंत तूं नरेंद्र ॥
गमे भुवनीं या स्वर्गीं जेंवि इंद्र ॥

---

१ दुसऱ्यावर. २पाय. ३ श्रीपालास. ४ममतेनें जांवाई पुत्राप्रमाणें.

अशा वचनें तोषवी जांवयाला ॥
त्वरें निघती ते पुरीं जावयाला ॥ ३२३ ॥

आर्या.

कांता साऱ्या घेउनि भूप आला उज्जनींत नृपसद्मीं ॥
संतोषें सुख भोगी आनंदे भृंग लोले हो पद्मीं ॥ ३२४ ॥
वास्तव्य दिवस थोडे केलें उजनीं अमोघ मोदानें ॥
प्रेमें पुसे मनीषा हाटकिलें वाटतें स्वदेशानें ॥ ३२५ ॥
राव प्रजापाल ह्मणे जामाता फार योग्य योजियलें ॥
परि तव पितृव्यानें[3] पूर्वीं लघुतम तुला किं मोजियलें ॥३२६॥

भुजंगप्रयात.

मतीमूढ तूझा असे नष्ट काका ॥
पहा हंस हे दीसती त्यास काकां ॥
सुसामोपचारें कसा देइ राज्य ॥
ज्वलीताग्निमध्यें पडे जेंवि आज्य ॥ ३२७ ॥

दिंडी.

दूत धाडूनी वृत्त कसें आहे ॥
प्रेम कितिसा वाटतो त्यास पाहे ॥
सोक्ष मोक्ष करूं तसे बोल येई ॥
चतुर दूता धाडूनि अर्धी देई ॥ ३२८ ॥

शा० वि०

तेव्हां शिष्ट चतूर एक बघुनी श्रीपाल त्या पाठवी ॥
जाऊनी अति आदरें करुनियां त्यांतें गड्या बोलवी ॥
हे राजाधिप सर्व राज्य धनही ज्याचें तया दे सुखें ॥
ऐसें तूं वद जा सख्या लवकरी सांगें खरें हें निकें ॥ ३२९ ॥

चामर.

लागलाचि शिष्ट वर्धमान पट्टनीं अला ॥
जावुनी नृपासना समीप त्यास बोलला ॥

---

१ लुब्ध. २ इच्छा. ३ काकानें. ४ फार नीच. ५ कावळे. ६ तूप. ७ अखेर परिणाम. ८ खचित.

हे प्रभो नृपोत्तमा नया करी वरी कृपा ॥
हेंच राज्य त्यास देइ ऐक गोष्ट ही नृपा ॥ ३३० ॥
वर्धमान ऐकुनीच स्तब्ध होउनी बसे ॥
काय काय? राज्य सर्व मागतोस! हें कसें ॥
कोण तूं? कुटील दूत, मागतोस मागणी ॥
मान हालवूनि भूप जा ह्मणेचि ये क्षणीं ॥ ३३१ ॥

स्रग्धरा.

वारी राशीतुनी जो तरुनि वसुमती-पाल पद्यें रचोनी ॥
मोहोनी अष्ट-जाया वरुनि बहु वधू मंडलाधीप आणी ॥
ऐसा तो पुण्यखाणी गुणि-गण-मणी जो या भुवीं चक्रवर्ती ॥
शांतीनें राज्य देई, झटपटचि न हो यांत होईल कीर्ती ॥३३२॥

आर्या.

शिष्टास ह्मणे राजा बालिशवत् बोल काय कामा जी ॥
वदतोस मर्कटासम तुमचें शूरत्व बायकां माजी ॥ ३३३ ॥
शूरोत्तंस असोनी वंचक होऊनि वंचिता कां जी ॥
ओष्टीं पीयुष असतां कोणी इच्छील प्राशना कांजी? ॥३३४॥

पद.

चाल—क्षणभंगुर संसार या चालीवर.

वर्धमान राया, मिथ्या बोलुं नये वायां ॥ धृ० ॥
धनसुत दारा राज्य संपदा । मोहविती काया ॥ मि० ॥ १ ॥
तथ्य पथ्य हें सत्यचि वरितां । पावसि जिन पायां ॥ मि०॥२॥
कठिण कसें वा नकळे पडलें । ज्याचें त्या छाया ॥ मि०॥३॥
आशेमध्यें व्यर्थचि गुंतशि । धर सद्गुरु पाया ॥ मि० ॥ ४ ॥
जीन कृपेनें बरेंच झालें ॥ थोर तयाची माया ॥मि०॥५॥३३५॥

---

१ न्यायास. २ श्रीपाल. ३ कवित्व करून. ४ गुणी समुदायांत श्रेष्ठ. ५ पृथ्वींत. ६ मूर्खासारखे. ७ मोठे वीर. ८ भिक्षुक. ९ अमृत. १० मद्य.

वसंततिलका.

सत्यामृता त्यजुनि नष्ट कुधी असत्या ॥
कूटांस[1] प्राशन करी पय[2] मानुनी त्या ॥
ऐशांस बोध करितां न गुणास कांहीं ॥
गाळूनि वाळु कण काय? सुतैल? नाहीं ! ॥३३६ ॥

अभंग.

नांहीं कांहीं ज्यास ज्ञान ॥ त्यास काय हो बोधुनी ॥
कापी गळा रत्नमाळा ॥ करी गर्दभ सोहळा ॥
बहिऱ्यापुढें केलें गान ॥ दावी अंधाशीं दर्पण ॥
तैसें बोधितां दुर्जना ॥ कांहीं नये त्याच्या मना ॥ ३३७ ॥

आर्या.

होती थक्कचि सज्जन ऐकुनि तें वचन वर्धमानाचें ॥
ह्मणती ज्याचें त्याला देणें हें योग्य कीं वि-मानाचें[3] ॥ ३३८ ॥

दिंडी.

परत येउनि रायास शिष्ट सांगे ॥
मनीं दुष्टाच्या नष्ट हेतु वागे ॥
बहुत धिक्कारुनि मला ह्मणे जा रे ॥
कोण कोठिल नष्ट हा घालवा रे ॥ ३३९ ॥

शार्दू० त्रि०

ऐकोनि नृपती अपार कटका[4]ची हो करी सिद्धता ॥
पादाती रविमंडळीं धुळि भरे धात्रीवरी चालतां ॥
ऐसें घेउनियां नृपाळ कटका चंपापुरीं पातला ॥
पाहोनी नृप वर्धमान लढण्यासाठीं बरा सज्जला ॥ ३४० ॥

आर्या.

गाजी रथ गज वाजीं उभय नृपांचीं मिळोनियां कटकें ॥
झगडति बहु प्रयत्नें स्वर्गस्थां[5]हि पाहताति एक टकें ॥ ३४१ ॥

---

१ विष. २ दूध. ३ विशेष सौख्याचें. ४ अगणित सेना.
५ देवादिक.

शार्दूलविक्रीडित.

शत्रूच्या हृदयास नेमुनि हणी रोपा[1]दिकांदी किती ॥
खड्गानें शिर तोडिती रणपटू[2] मर्मी किती मारिती ॥
रक्तानें किति नाहती भ्रमुनियां मूर्च्छीत होती किती ॥
ईर्षेनें झटती कितीक पडती शीर्षाविणें नाचती ॥ ३४२ ॥

आर्या.

लक्षावधि रणि पडतां रुधिर[3] नद्या वाहती तया समरीं ॥
अगणित नाश देखुनि मंत्री[4] सरसावुनींच स्वस्थ करी ॥ ३४३ ॥
सुचवी वीरमणी हो तुमचें हें युद्ध सद्य[5] राहूं द्या ॥
चालूं द्या रथयुद्धीं उभयांची तुल्यता[6]चि पाहूं द्या ॥ ३४४ ॥
खड्गादि सर्व ठेउनि सज्जुनि चापासि ते रथीं चढले ॥
भिडले अति त्वरेनें सन्निध जडले बरेच ते लढले ॥ ३४५ ॥

शा० वि०

चापातें धरिती करें शर अती भात्यांतुनी काढिती ॥
जोडीती गुणं[7] ओढिती न समजे वैऱ्यावरी सोडिती ॥
असें वारिति एक एक वदती निर्वाण जाणीवती ॥
अष्टादिक्[8]शरभार देखुनि किती रथ्यास धीरावती ॥ ३४६ ॥

शि० वृ०

तदा श्रीपालाचे शर शिर चुकोनि मणिमय ॥
मुकूटातें लागे कठिणचि गमे त्यास समय ॥
रणीं मानाची हो किरिट पडतां होतहि हनी ॥
ह्मणे मृत्यूपेक्षां अपजय कमी काय भुवनीं ॥ ३४७ ॥

आर्या.

रणिं वर्धमान राजा पडतां मुकुटार्थ घाबरा झाला ॥
इकडे हर्षध्वनिनें सकल चमू वर्णितात श्रीपाला ॥ ३४८ ॥

---

१ बाण. २ योद्धे. ३ रक्त. ४ मुख्य प्रधान. ५ सध्यां. ६ बरोबरी.
७ धनुष्याची दोरी. ८ आठ दिशांनीं बाणांचा वर्षाव.

नृप वर्धमान याचा पडतां तो मुकुट शास्त्रवित्तातें[1] ॥
स्मरुनि ह्मणे मजला हें राज्य नको दुःख देई चित्तातें ॥३४९॥

शा० वि०

शूराला भय शत्रुचें युवतिचें तारुण्यरूपाप्रती ॥
भोगा रोग, कुला कुपुत्र असतां कायेस मृत्यूभिती ॥
भूपाचें धनवंत यास भय हो ऐवं[2] असे भंगुर ॥
वैराग्यास नसेच तें ह्मणुनियां ध्यावें जिनाधीश्वर ॥ ३५० ॥

घनाक्षरी.

वर्धमान महाराज । राज्य त्याज्य वाटे आज ॥
साधुपद्मीं मोठें काज । साधनास पातला ॥
सुदर्शनकाननांत । तेथें वसे मुनी-नाथ ॥
भावें वंदुनिया शांत-सद्गुरूस भेटला ॥
कृपा करि महाराजा । धरियेलें पदांबुजा ॥
दृष्टि देइ या अंधजा[3] । दीक्षा हीच पाहिजे ॥
मज नाहिं कांहिं ज्ञान । मूढ पतित अज्ञान ॥
काय लोभ-सुरा-पान । व्यर्थ हाय ! शीणलों ॥
धरियेले तुझे पाय । स्वामि तूंच बाप माय ॥
तुजवीण जगीं हाय ! । सांगे मार्ग चांगला ॥ ३५१ ॥

शा० वि०

रात्रीच्या समयीं रणीं नचि दिसे तो वर्धमान प्रभू ॥
श्रीपालासह शोधितां वनिं वसे घेऊनि दीक्षा विभू ॥
त्यातें देखुनि लोक सर्व ह्मणती राजा भलागा भला ॥
ऐसें शाश्वत[4] सौख्य भोगत बसे देवेंद्र ज्या लाभला ॥३५२॥

अभंग.

मनुष्य हा प्राणी, तप तप करी, मोक्षाच्या त्या द्वारीं, जाण्यालागीं॥
जाण्यालागीं साधीं, बारा प्रकारानें, व्रत नेम दान करोनीयां ॥

---

१ शास्त्ररूपी द्रव्यातें. २ एकंदर. ३ जन्मांध. ४ चिरकाल टिकणारे.

करूनियां दान, सत्पात्रालागुन, तेणें मोक्षस्थान, मिळों येत ॥
मिळों येत स्थान, करी दश धर्म, सर्व दग्ध कर्म, अंतरींचें॥३५३॥

शा० वि०

त्या युद्धीं जय पावुनी नमुनियां स्वामीस श्रीपाल तो ॥
आनंदें विजयोत्सुकें स्वनगरीं कांतासवें चालतो ॥
तेथें जाउनियां नृपासनिं बसे मंत्री बरे भोंवतीं ॥
न्यायानें नय सांगती चतुरही राजाप्रती वानिती ॥३५४॥
बंडा जे करिती तिथेंच मरती शास्ता खरा भूपती ॥
सिंहाला मृगबाल जेंवि भिउनि शत्रू तसे कांपती ॥
विद्येचा बहुमान नित्य करितो जो सज्जना वाढवी ॥
पात्रापात्र विचार दान करितो दीना न तो आडवी ॥३५५॥

उपेंद्रवज्रा.

सभोंवतीं बैसविलेचि मंत्री ॥
असेंचि कार्यीं खपतीहि तंत्री ॥
अशामधें नाटक नृत्य चाले ॥
विलोकितां सर्व मनांत धाले ॥ ३५६ ॥

आर्या.

कष्टाधीनहि दैवचि दैवाधिन सुकृत फल तदाधीन ॥
सुज्ञा वाक्याचरितां भुक्ती मुक्ती मुळें तदाधी न ॥ ३५७ ॥

मालिनी.

वर पद मिळतें त्या पूत देहास राया ॥
धवल यश सुकीर्ती शोभते भव्य बा या ॥
सुरुप गुण विचारी प्राप्त होतात जाया ॥
सवघड सुरलोकां मार्ग हा शीघ्र जाया ॥ ३५८ ॥

---

१ जयाच्या आनंदानें. २ शिक्षा देणारा. ३ शाहाण्याच्या वचनाप्रमाणें वागलें असतां. ४ तत्+आधी+न=ती. मानसिक व्यथा ही नाहीं.

वसंततिलका.

श्रीपालराज प्रभु होय मनांत हर्षी ॥
भद्रीं[1] बसे तंव तिथें वनप[2] प्रकर्षी ॥
येऊनीयां ह्मणतसे नगिं येई साधु ॥
देवेंद्र ज्यास नमिती महिमा अगाधु ॥ ३५९ ॥

दिंडी.

दर्शनाची लागुनी आस त्यातें ॥
सकळ सेना चालली सवें पंथें ॥
पुढें वाद्यें वाजती बहुत भेरी ॥
रव न माये अंबरीं हर्ष भारी ॥ ३६० ॥

शा० वि०

माया नाश करावयास नृपती होऊनि शुद्धांतरी ॥
घेवोनी वसुद्रव्य पाद पुजुनी लक्षैक मंत्रावरी ॥
आनंदे मनुकोटिं जाऊन बसे संतोषि देवांगना ॥
प्रेमार्द्रे निजदृष्टिनेंहि मुनिच्या घेऊनियां दर्शना ॥ ३६१ ॥

ओंव्या.

शक्रें पूजिला मुनिवर । सांगा ह्मणे जी सिद्धांतसार ॥
जोडोनियां उभय कर । भूप विनवी स्वानंदें ॥ ३६२ ॥
ऐकोनी विनंती मुनीश्वर । अगमशास्त्र असे अपार ॥
त्यांतील ऐका अल्प सार । सज्जन सुज्ञान श्रावक[3] ॥ ३६३ ॥

पद.

चाल—अशाश्वत संग्रह कोण करी ॥

जिन धर्म चित्तिं धरीं प्राण्या जिन धर्म चित्तिं धरीं ॥धृ०॥
व्यर्थचि मायापाशिं नको गुंतुं-कर्मविपाक[4] करी ॥ जि० ॥१॥
अशाश्वत काया[5] अशाश्वत सर्वहि-पास्तव भक्ती वरी ॥ २ ॥

---

१ सिंहासन. २ वन पाळण करणारी. ३ श्रोते. ४ कर्माचा परिणाम. ५ शरीर.

छेदेन भेदन रौद्र न कीजे-व्रत नेम नित्य धरी ॥ ३ ॥
स्वसम पर जीव मानुन चित्तीं-प्रसंगीं वाणि खरी ॥ ४ ॥
निर्मळ जिन धर्म पाळुनि जावें-सद्गतिचीये घरीं ॥ ५ ॥ ३६४ ॥

साकी ( कानडी ).

सद्गति हादी केळो मनुजा, ²हिडिबिगिनी सत्संगा ॥
अरविंदागीभृंग अगोदो आदोतो, भय भंगा ॥ ३६५ ॥

आर्या.

नृपवर करयुग जोडी पुनरपि वंदोनियां मुनीराय ॥
पूर्व भवांतर सांगा ऐसें प्रेमेंचि बोलतो राय ॥ ३६६ ॥

शा० वि०

सांगे मोक्षपती भवांतर खुणा ऐकें नृपा संप्रती ॥
कर्मे छेदुनि पोषि संचित तरू बोधोदकें सिंचती ॥
येती त्यास फुलें फळेंहि बरवीं सौगंध भारी वसे ॥
पावे मान जगीं मनोरथ तशी कीर्ती तिजीं त्यां असे ॥ ३६७ ॥

आर्या.

ऐसे सुकृत तरु हे, लावुनि चित्तांत वाढवी राया ॥
दैव असे ज्या स्वाधिन, शक्यपणें विघ्न काढ वीरा या ॥ ३६८ ॥
सद्धर्मीं रत होई ध्यायीं जिनपद नरोत्तमा ध्यानीं ॥
एक लयीं रूप दिसे वस्तूचें जेंवि तेंवि माध्यानीं ॥ ३६९ ॥
केवलज्ञान सुनयनीं पाहुनि मी सांगतों अगा राया ॥
तथ्यचि पूर्व भवांतर ऐकुनि घे नित्य ये अगारा या ॥ ३७० ॥
जंबुद्वीपानुपमीं क्षेत्र दिसे भरत नाम त्या गाजे ॥
शोभे विजयार्ध नगें वाटे भूमीहि भूषणें साजे ॥ ३७१ ॥

शा० वि०

त्या देशीं शुभरत्न संचय पुरीं श्रीकांतची श्रीमती ॥
राजा नष्ट अती सती गुणवती लावण्यही श्रीमती ॥

---

१ तोडणें, फोडणें, क्रौर्य. २ मार्ग. ३ ऐक. ४ धर. ५ लवकर. ६ पुण्याईचें झाड. ७ तिसरी. ८ दोनप्रहरीं. ९ आश्रमास.

देती दान व्रतीं निमग्न असती भक्ती सुधर्माप्रती ॥
शीला राखिति संजमा बहु नती दैवत्य मानी पती ॥३७२॥
क्रीडार्थी विपिनीं निघे तवं मुनी पाहोनि त्यां वंदुनी ॥
हर्षोनी, कमलें विधूस बघतां कीं चक्रवाका मनीं ॥
क्षीराब्धी भरती उचंबळुनियां सस्मीत बोलूनियां ॥
पावाजी यतिराज आज मजला सद्धर्म सांगूनियां ॥ ३७३ ॥

इंद्रवज्रा.

राजा तदा सेवि अणु व्रतातें ॥
भक्ती गुरूची करुनी जिनातें ॥
पूजी मनापासुनि ज्यास भक्ती ॥
तेथें सहाशत्रु कशास येती ॥ ३७४ ॥

उपेंद्रवज्रा.

पुढें कुसंगें व्रतभंग झाला ॥ करी जसा सैंधवें त्या पयाला ॥
जाळी तृणा पावक संगतीनें ॥ जसा हिरा भंगत ढेंकणानें ॥ ३७५ ॥

शा० वि०

शस्त्राच्या शयनावरी पहुडतां राहील काया कधीं ॥
कंठीं बांधुनि प्रस्तरा जलनिधीं जाई तरे कां कुधी ॥
केलें त्वां व्रतभंग हे ह्मणुनियां तें राज्यभ्रष्टत्व ये ॥
दुष्टा भोगुनि कष्ट तुष्ट करिरे श्रेष्ठादि इष्टत्व ये ॥ ३७६॥

आर्या.

श्रीकांत नग्न मुद्रा-धारीनें ग्रंथ पाहिला अटवीं ॥
केली निंदा त्याची मौर्ख्यें तूं सौख्यसिंधुतें अटवीं ॥३७७॥
मिळुनी शतसप्त तुह्मी केली निंदा कुबुद्धिनें कोडीं ॥
तोडी सुखवृक्षातें जोडी कर्मास होय वपुं कोडी ॥३७८॥
यास्तव सज्जन निंदा-न करी स्वमुखें कदापि भूपाळा ॥
होई गुरुपदिं तल्लिन आर्जव धर्माप्रती विभूं पाळा॥३७९॥

---

१ पातिव्रत्य. २ मीठ. ३ धोंडा. ४ अरण्यांत. ५ कौतुकानें. ६ शरीर. ७ राजा.

क्रीडा वनीं कराया विपिनीं गेला असेचि श्रीकांत ॥
सकळ जनासह शोभे भासे तो श्रेष्ठ काय श्रीकांत ॥ ३८० ॥

उपेंद्र वज्रा.

तडागा[1] तटीं तापसी[2] एक पाहे ॥
दहा लक्षणीं[3] युक्त ध्यानस्थ आहे ॥
नसे दोष त्या योगियां शांत चंद्र ॥
जणो स्थान घेऊनि होईल इंद्र ॥ ३८१ ॥

---

स्मृती नसे त्या किमपी यतीतें ॥
मुक्तीविणें व्यर्थ गमे तयातें ॥
गेला चिदानंद[4] भरोनि चित्तीं ॥
प्रत्यक्ष भासे परमेशमूर्ती ॥ ३८२ ॥

ओंव्या.

सातशें अंगरक्षकां[5] सहित ॥ देखोनियां स्वामी महंत ॥
हा मलीन असे यथार्थ ॥ न मिळे स्नान ह्मणती कीं ॥ ३८३ ॥
एक ह्मणे दुर्गंध येतसे भारी ॥ दुजा ह्मणे फेंकों यांतें सरोवरीं ॥
ऐसें बोलती दुराचारी ॥ आत्मघाता उदेले[6] ॥ ३८४ ॥
थट्टा करिती यतीची ॥ निंदित वाणी निंदकाची ॥
त्यांनीं लोटिली[7] सन्मुनीची ॥ मूर्ती सरोवरीं त्या ॥ ३८५ ॥

भुजंगप्रयात.

यती भेटतां दुष्ट जो त्यास त्यागी ॥
हिरा अंबुधीं टाकिती जैं अभागी ॥
घरीं कामधेनूहि चालूनि येतां ॥
हणी यष्टिनें[8] काय कल्पद्रु होतां ॥ ३८६ ॥
चिंतामणी रत्न मिळे खुळ्याला[9] ॥
वारांगना सुंदर नेभळ्याला ॥

---

१ सरोवर. २ ऋषी. ३ निबंध पहा. ४ चिन्मय स्वरूपाचा आनंद. ५ सैन्य. ६ प्रवर्तले. ७ काठीनें. ८ कल्पवृक्ष. ९ जाळणारा.

काकास पक्कान्न रुची कळेना ॥
साधूवरी दुर्जन तैं वळेना ॥ ३८७ ॥

आर्या.

सन्मुनि समाधि होतां राजाचें चित्त फार कळवळलें ॥
सत्वर धांवुनि येऊन मुनितें काढावया सकळ वळले ॥ ३८८ ॥
घोरार्णवांतुनी त्या काढिति सर्वज्ञ तैं यती यास ॥
भंग समाधि न होतां येई वरि भोगतां न आयास ॥३८९॥
निर्भर्त्सना यतीची केली पूर्वी ह्मणूनि धनपाळा ॥
सद्गीं बहूरूपीं तो पुत्र ह्मणे हेंच सूत्रे श्रीपाळा ॥ ३९० ॥
उपवनिं कल्पतरूतें कैसें छेदिति विवेकशून्य नर ॥
पोषिति कनकां कृष्णा तत्फळ भक्षूनि वांच्छिती अमरें ॥३९१॥

मालिनीवृत्त.

यतिछल करुनीयां दुष्ट ऐसा कुभावें ॥
सु सदन खल जैसा जालुनी सौख्य पावे ॥
मग कुनि तयातें स्वस्थ थारा बसाया ॥
वरि बहुत मनीं हो ताप संताप राया ॥ ३९२ ॥

आर्या.

अनुदिनिं यतिछल करुनी मानेलें तसेंच मूर्ख वर्ततसे ॥
दुष्टाचरण करी तो, त्यजुनी सुविचार दुष्ट भाव तसे ॥३९३॥
साध्वी श्रीमति ऐसें पत्युद्धतवृत्त परिसतां भ्याली ॥
प्रिय राज्यभार सोडी संजम भारा व्रतादि ती ल्याली ॥३९४॥
सति सद्व्रत आचारितां सद्धर्मी लुब्धलाचि नृप नित्य ॥
पश्चात्तापें शुद्धी येते ही गोष्ट जाणिली सत्य ॥ ३९५ ॥
पतिहुन सति सद्धर्मी रत होई भ्रमरि जेंवि ती कमलीं ॥
सत्कीर्ति गीयमानचि माझी बुद्धीहि गायनीं भ्रमली ॥ ३९६ ॥

---

१ श्रीपालास कोड भरण्याचें कारण. २ बागेंत. ३ काळा धोतरा. ४ स्वर्ग. ५ मनाप्रमाणें. ६ पतीची उद्धटपणाची वर्तणूक. ७ व्रतमार्ग. ८ वर्णनीय.

इंद्रवज्रा.

गंगा पवित्र निधिहून गमे जगांत ॥
मंदोदरी दशशिराहून नीतिवंत ॥
ऐशी सती गुणवतीहि पतीस सांगे ॥
सद्धर्म हेतु पतिहून मनांत वागे ॥ ३९७ ॥
ज्या त्यागिती शील व्रतास नारी ॥
वाजे त्रिलोकीं अपकीर्ति भेरी ॥
लावी मुखा कज्जल कालिमा ये ॥
पाडी तमाऽधींतचि तातमाये ॥ ३९८ ॥

साकी.

सखिवदनामृत वृत्त परिसतां भूप मनीं संतोषे ॥
मिथ्यत्वाचा तरु तोडी तो सद्धर्माच्या घोषें ॥ ३९९ ॥

आर्या.

श्रीकांत मुनीशाच्या सन्निध जाउन ह्मणे यतीराया ॥
मी पापी व्रतभंगी निंदक नाहीं मला दया माया ॥ ४०० ॥

वसंततिलका.

मी पातकी नकुलुनी विषवल्लरीतें ॥
घालोनियां सलिल वाढविलें तयातें ॥
जो प्राणहारक भुजंग दिसे उशाला ॥
घे अग्निरत्न गमुनी पदरीं दुशाला ॥ ४०१ ॥

आर्या.

सहकाराऽटवि छेदुनि अज्ञपणें करिरें कुटज हा पोशी ॥
अमृतस्वादा टाकुनि अर्कीचा मी सदैव रस प्राशीं ॥ ४०२ ॥
तेणें विकार शरिरां–जडतो जाणाचि दीर्घ–ऱ्हस्व गर्द ॥
कुशल असे तूं वैद्या सांगुनि पथ्यास तथ्य दे स्वगद ॥ ४०३ ॥
उपहासोक्त कुधी हा कंटकतरु वाढवी जगीं वाया ॥

---

१ रावण. २ नौबत. ३ अंधकारांत. ४ आम्रवृक्ष. ५ कुड्याचें झाड. ६ मोठे. ७ लहान. ८ रोग. ९ चांगलें औषध.

नकळे विचार कांहीं तेणें भ्रमलों भवांतं[1] यतिराया ॥ ४०४ ॥
अष्टाणिक व्रत पावक[2] हस्तीं विधियुक्त सांगुनी द्याया ॥
तेणें मल तृण सारें जळूनि जावो करा अशी माया ॥ ४०५ ॥
शरणागत रक्षक हे साधू तत्काल पावति शरण्यां[3] ॥
सद्बोध अग्नियोगें दग्धागति करिती जे भवारण्या ॥ ४०६ ॥

ओंव्या.

आषाढ कार्तिक फाल्गुन ॥ शुक्लपक्षीं पूजा करून ॥
भक्तीभावें जिनेंद्र आराधून ॥ प्रसन्न करी राजया ॥ ४०७ ॥
अष्टरीती अष्ट दिन ॥ दशविध तपा आचरून ॥
काया वाचा मनें करून ॥ सेवा करी जिनेंद्राची ॥ ४०८ ॥
शक्त्यनुसार जिन मंदिर ॥ बांधोनि स्थापी जिनेश्वर ॥
मोक्ष पथ दर्शक अंबरीं ॥ जणो पताक फडफडते ॥ ४०९ ॥

---

वसंततिलका.

ऐकोनि साधु वचनास त्रिकर्ण शुद्धी ॥
पावोंनि राय बरवी धवलत्व बुद्धी ॥
कामादिशत्रु पळवी व्यसनास छेदी ॥
संसार कानन त्यजी जिनपाद वंदी ॥४१०॥

कटाव.

दीक्षा घेऊन राजाराणी–स्मरणी हातीं शोभे ध्यानीं–समाधि जडली नामस्मरणीं–नृपेंद्र राणी सति इंद्राणी,–भासे अनुदिनीं–मोक्षसुखातें भोगिति यापरी–रजतमसत्वहि जाती उपरी–निरहंकृती[4]–जिनधन इच्छिती–ध्याती गाती प्रसाद वरिती–सदैव अगमामृत प्राशिती–सुरवधु रंभा नृत्य करीती–अपमृत्यूतें लाथ हाणिती–भासमात्र सुख[5] कशास वरिती–तपतेजानें सुवर्ण काया–वाट दाविली आयामाया– ॥ स्वर्गीचें सुख हें कोणी ॥ जाणतील मानव प्राणी ॥ ४११ ॥

---

१ प्रपंचांत. २ अग्नि. ३ शरण आलेल्यास. ४ निरभिमान. ५ सुख ह्मणून वाटणारें.

आर्या.

चर्म शरीरें झाला चंपापुरिं उज्जनीं तुझी दोघें ॥
निधि सरितां जणु वाटे भेटियला पूर्व कर्मिच्या ओघें ॥४१२॥
श्रीपाल भवांतर खुण ऐकुनियां तोषला मनीं भारी ॥
वंदुनि मुनीश्वराला द्या दीक्षा या क्षणींच कांतारीं ॥ ४१३ ॥
मुनिवर्या कर जोडुनि संजम तैसेंच मागती नारी ॥
सद्धर्म तरू लावा चित्तीं वर्षो सुबोध घन वारी ॥ ४१३ ॥
दीक्षा चिंतामणिचा बांधोनी रत्नहार श्रीपाला ॥
तेणें मोहक-रज्जू छेदुनि भवकाष्ट काढितां धाला ॥ ४१५ ॥
क्रोध असे वडवाग्नी शमवायातें क्षमांबु हो वर्षी ॥
मार्दव खड्गानें हो मायातरु छेदिला महोत्कर्षी ॥ ४१६ ॥
कांतेसह व्रतसंजम धर्मामृत पी तसेंच सवडीनें ॥
मायूतें बालक जैं चोखी प्रेमें बहुत अवडीनें ॥ ४१७ ॥

भुजंगप्रयात.

जगामाजिं तें थोर वैराग्य रत्न ॥
मिळाया सुधी ते करीतात यत्न ॥
तया प्राप्त होतां मनीं हर्ष दाटे ॥
धना पाहुनी निर्धना सौख्य वाटे ॥ ४१८ ॥
धनाधीश याला भिती चोर याची ॥
असे ती शरीरा तशी ही क्षयाची ॥
पिडा सज्जना दुर्जनाचीच खोटी ॥
विरागाविणें शांति नाहीं चखोटी ॥ ४१९ ॥

---

अहो लोकहो सर्व साम्राज्य सोडा ॥
तशी वैभवाची अशा सर्व तोडा ॥
हिताकारणें भासती मोह सारे ॥
त्यजावे जिनावांचुनी हे पसारे ॥ ४२० ॥

---

१ चर्ममय शरीरानें. २ नदी. ३ आरण्यांत. ४ पाश. ५ क्षमारूपी जल. ६ स्तनातें. ७ ज्ञानी.

भला भूप तो चिन्मयीं गुंग झाला ॥
स्वरूपीं लय ध्यास लागे तयाला ॥
शरीरादिकांची नसे हो कशाची ॥
अशा त्या नसे आणखी ती जिवाची ॥ ४२१ ॥

वसंततिलका.

गंभीर धीर जलधी नग मेरु वाटे ॥
तेजें रवी, शुचिहुताश, क्षमाच धात्री ॥
तो शांत चंद्र दशधर्म वसे जिवाशीं ॥
इंद्रीयनिग्रहे[2] करी यति शुक्ल ध्यानीं ॥ ४२२ ॥

दिंड्या.

सर्व सोडुनियां भूप मुनी झाला ॥
ब्रह्मरूपातें बघुनि मनीं धाला ॥
हेंचि चिन्मय भासलें सर्व त्याला ॥
दया शांतीचें वस्त्र प्रभू ल्याला ॥ ४२३ ॥
मुनी पूजाया देवेंदेव[3] येती ॥
यक्ष किन्नर गंधर्व पशू जाती ॥
भक्तिभावें आसक्ति धरिताती ॥
मुखें त्रैलोक्यें त्यास वर्णिताती ॥ ४२४ ॥

आर्या.

योगी पतीहि होतां तद्भार्या तेंच वृत्त पथकरिती ॥
पतिभक्ति याचि मार्गें सानंदें सुव्रत मोक्षपथें[5] वरिती ॥४२५॥

शिखरिणी.

पतीठायीं भक्ती उदित दिसते तीवर–सती ॥
अनूगामी होणें उचित वरिते[4] मार्ग सुदती ॥
सुरामा दीक्षा संजम जल भरोनीहि दुतटीं ॥
मिळों आल्या वाटे पतिरति निर्धातें बहुहटी ॥४२६॥

---

१ इच्छा. २ दमन. ३ देवेंद्र. ४ स्वीकारते. ५ चांगले आचरणानें मोक्षमार्ग.

पती योगी होतां सकल नलिनी संजम-घृता ॥
क्षमादुग्धा पीती जिनमन कळे ज्या पतिहिता ॥
दिसे मुक्ती-सौख्याविण विषय सारे विष जसे ॥
कृपाळू देवाच्या चरणकमलीं तल्लिन वसे ॥ ४२७ ॥

शार्दूल०

ही श्रीपालकथा महाविर-मुनी श्रेणीक रायाप्रती ॥
सांगे तो सुमती तदा श्रवणीं घे ऐकोनि हो सद्गती ॥
स्वामी आज दिनास पीयुष दिलें कीं रत्न चूडामणी ॥
हें भाग्योदय आमुचें ह्मणुनियां सांगीतला ये क्षणीं ॥४२८॥

आर्या.

हे राजा त्वां जावें नीतीमार्गें तसेंच धर्मानें ॥
षड्रिपुतें जाळावें मानस न मळो कदा कुकर्मानें ॥ ४२९ ॥
विषया विषसम ना गणि सेवुनि मेला कुधी ढवळ शेट ॥
त्यजितां विवेकमात्रचि गेला कुंडी कुरौरवीं थेट ॥ ४३० ॥
शील असे हें तारूं यावरती बसुनि बहुत जन तरती ॥
ती मदनमंजुषी तैं तरुनी गेली अदुःख निधि वरतीं ॥४३१॥
बहुसंकटांत न सुचे पाशामध्येंचि मृग जसा पडतो ॥
धैर्यें जिन ध्याती त्यां विवेक करितांचि मार्ग सांपडतो४३२
दशधर्म रत्नहारचि त्यांत अहिंसा मणी अमोल असे ॥
घेउन हार जपावा जपती प्राणास प्राणिमात्र जसे ॥ ४३३ ॥
सर्व रसाहुन रस हा मधुर असे एक तोचि तें नाम ॥
प्रेमें पान करींगा तेणें पावेल चित्त आराम ॥ ४३४ ॥
श्रीपालचरित्रामधिं शांती, नीती, सुशील, वैराग्य ॥
पय घृत मधु स्वादू[2] हे मिश्रित जो सेवि तोचि बहु भाग्य॥४३५
ऐशी ही मधुर कथा कोण कविश्रेष्ठ प्राशितां टाकी ॥
तो दुर्भाग्य गणावा त्यजुनी दुग्धास तृप्तो ताकीं ॥ ४३६

इति श्रीपालचरित्रकथा समाप्त.

---

१ न जाणतां. २ शर्करा.

# जिनधर्मावर निबंध.

जिनधर्मानुवर्ती मद्देशबांधवहो, हा जिनधर्म कोणी कधीं स्थापिला ह्याचा पुर्ण निश्चय ठरवितां येत नाहीं. कारण प्रत्येक धर्मावर प्रत्येक व्यक्तीचीं भिन्न भिन्न मतें आहेत. तीं सर्वच मी सांगण्यास असमर्थ आहें, तथापि एक दोन तरी सांगितल्यावांचून राहवत नाहीं.

पहा, जैनलोक असें मानितात कीं, अधीश्वर, भरतेश्वर, हेच महंत ह्या धर्माचे उत्पादक आहेत; दुसरे ह्मणतात हा धर्म बुद्ध धर्माच्या मागून निघाला. यूरोपस्थ समजतात कीं, हा धर्म गौतम ( शाक्यसिंह ) यानें स्थापिला; आणखी कित्येकांचें असेंही मत आहे कीं, शेवटचे तीर्थंकर जे पारिश्व, वर्धमान हेच धर्माचे मूळस्तंभ आहेत. याप्रमाणें लोकभेदानें व जातीधर्मानें प्रकृत धर्माविषयीं मतांतरें आहेत.

तथापि ह्या सर्वांचीच सिद्धता करीत बसण्याची सध्या जरूर न बाळगितां चालू प्रकारावर थोडी माहिती देतों.

१ पहिल्या मताच्या पुष्टयर्थ मजपाशीं फारसें साधन नाहीं.

२ बौद्धाच्या मागून हा+ धर्म गौतमानें* स्थापिला हें ह्मणणें आह्मांस अगदीं अग्राह्य आहे. कारण बौद्धलोकांनीं जैनांचीं शास्त्रें पाडावें केलीं, देवालयांचा विध्वंस करून उद्ध्वस्त करून सोडिलीं. मग तेथेंच त्यांनीं आपल्या देवांच्या स्थापना केल्या. उदाहरणार्थ पंढर-

---

+ या धर्मावर दोन विद्वानांची चर्चा आहे. * गौतम ह्मणून एक अग्निहोत्री ब्राह्मण होता, तो आपल्या विद्वत्तेचा फार गर्व दाखवीत असे. वर्धमान तीर्थंकरांनीं वेश्यारूपानें मोठा सदुपदेश केला. तेव्हां सर्व गर्व परिहार होऊन आला, तेव्हां त्यास गणधराची पदवी दिली. तोच गौतम मागधी भाषेंत 'पुराण रचणारा' प्रसिद्ध झाला. जैनांच्या सहवासानें गौतमानें तुलसीपूजा त्यागिली. त्यावरून ब्राह्मणलोक जैनांच्या देवालयांत जाण्यास मागें पाय ओढितात.

पूरचें विठोबाचें देवालय हें पूर्वीं जिनचैतालय असून त्यांत नेमिनाथ[1] तीर्थंकराची स्थापना केली होती. ती बौद्धांनीं पाडाव केली व तेथें विठोबाची स्थापना केली. तें पुढें ब्राह्मणांनीं आपल्या ताब्यांत घेतलें.[2]

३ धर्मस्थापकत्व गोतमास अगदींच शोभत नाहीं. कारण जो दुसऱ्याच्या तोंडून बोध श्रवण करून जैनांत मिसळला, पुढें त्यानें विद्वच्छक्तीच्या बळावर सदर धर्मावर अनेक पुस्तकें केलीं ह्मणून धर्म-उत्पादकर्तृत्व मिळेल काय? धर्म प्रसिद्धी करणारा ह्मटल्यास हरकत नाहीं.

४ वर्धमानस्वामी धर्माचे स्थापिते ह्मणावें तरी त्यांनीं कर्नाटका-कडे दृष्टीसुद्धां केली नाहीं, मग आगमनाचें नांव कोठचें. कारण कीं, तिकडे धर्म प्रसृत झालेलाच आहे. मग तिकडे जाण्याची मुळींच जरूर दिसली नाहीं ह्मणून धारा तीर्थापर्यंतच आले होते. ह्यावरून तेही वरच्याच मासल्याचे एकपक्षी बनले व त्यांच्या आधीं धर्म होता. असें सिद्ध होतें.

याप्रमाणेंच पांचव्या मताची अवस्था. एवं मूलाधार निःसंदेहयुक्त असा सांपडणें ह्मणजे फार कठीण झालें. असो.

कोणताही धर्म असो, धर्म ह्या शब्दांतील खरा अर्थ मात्र असला पाहिजे, मग त्यापासून तज्जातीय लोकांस वर्तनक्रमाच्या श्रद्धेच्या मानानें फलप्राप्ती निश्चयानें होते. हें ह्मणणें निर्विवाद आहे.

हें धडधडीत नेत्रांस दिसत असून आमच्या कित्येक देशबंधूंस, व धर्माभिमानाच्या तोऱ्यानें वागणारांस आपल्या धर्मात काय आहे व धर्म कोणत्या रंगाचा आहे हें सुद्धां माहीत नाहीं. हाय हाय ही मोठी शोचनीय गोष्ट आहे. ह्मणून त्यांनीं पुढील चार ओळींवर तरी पूर्ण ज्ञानां-जन चढवून दृष्टी फेंकावी अशी त्यांस मी बंधुत्वानें शिफारस करितों.

प्रकृत धर्मात जीववध अगदीं उपयोगाचा नाहीं. सर्वांशीं सख्य असावें (समता सर्व भूतेषु संयमं शुभभावना) ह्मणजे धर्म होतो. आणि दुराचारानें

---

१ नेमिनाथ हा यादवकुळांत जन्मला असून कृष्णाचे वैमनस्यामुळें वि-रागी झाला. तेंव्हां त्यास तीर्थंकर पदवी मिळाली. असें शास्त्रसंमत आहे.

२ जैनांच्या देवालयाप्रमाणें हें आहे, असें स्पष्ट दिसेल.

वागून जीवास त्रास झाला कीं अधर्म झाला. ह्मणून मुख्य अहिंसत्ववृत्त असलें पाहिजे. कारण ह्मटलें आहे "अहिंसा परमोधर्मः" कारण "अधर्मःप्राणिनांवधः" ह्मणून हिंसत्व वर्ज होय. मग हा सामान्य धर्म आहे काय? पहा, ज्यांत हिंसा आहे तो धर्म नव्हे. कारण धर्म शब्दाचा अर्थ कल्याणप्रद आहे. मग हिंसत्वांत कल्याण नाहीं ह्मणून अहिंसत्वच धर्म होय—तसेंच धर्म हें सर्व प्राणीरूपी शरीरास सुख देणारें एक प्रकारचें दूधच आहे. त्याच्या प्राशनानें स्वशरीरास सौख्य मिळून परजीवासही यत्किंचित् त्रास न होतां सानंदवृत्ति असणें हाच धर्माचा वास्तविक गुण आहे आणि वर्णांत भेद न मानितां रूईचा चीक त्याला तर सुकृतीचा त्याग हा दोष असून प्रकृतीस विकृती होऊन ऑ करून बसलेल्या काळाच्या तोंडांत सांपडला. याचें नांव अधर्म. ह्मणून त्याचें वारें सुद्धां घेतां उपयोगीं नाहीं.

यास्तव धर्माचीं खरीं लक्षणें पाहून त्याजवर श्रद्धा ठेवावी, ह्याविषयीं विचारी केवली मत देतो कीं; कोणत्या व कसल्याही प्राण्याचा घात न करितां उलट त्यास सुखोत्पत्ति देण्याचा इलाज करून सदोदित दयार्द्रवृत्ति धरावी, हीच धर्मप्राप्तीची सोपी वाट आहे.

आतां अहिंसा धर्म रक्षण करण्यास अथवा त्याची प्राप्ती करून घेण्यास दशलक्षणरूपी माळ कंठांत धारण केली पाहिजे. त्यांत मुख्य दयाधर्म आहे. तुळसीदासानें ह्मटलें आहे "दया धरमका मूल है, नरकमूल अभिमान" ह्मणजे धर्माचें मूळ काय? दया. नर्काचें मूळ अभिमान. यावरून दया हें एकत्व मिळण्यास १० लक्षणें लागतात. जसें १६ आण्यांनीं रूपया होतो तद्वतच दशलक्षणयुक्त असल्यावांचून दया नाहीं. व त्या दयेवांचून धर्म नाहीं—ह्मणून धर्माचीं दाहा लक्षणें[1] पुढें क्रमानें सांगतों.

| धर्माचें नांव | लक्षणें. |
|---|---|
| १ दया, क्षमा, शांति.... | सर्व जीवन्मात्रावर समाधानें दया करणें. |
| २ मार्दव.... .... .... | सर्वांशीं स्नेहत्वानें वागावें. |
| ३ आर्जव .... ........ | सर्वांशीं नम्रपणानें गोड बोलावें. |

१ या लक्षणालाच धर्म संज्ञा आहे.

| | |
|---|---|
| ४ सत्य ................ | सर्वांशीं खरें भाषण बोलावें. |
| ५ शुचित्व .... ........ | काया, वाचा, मन शुद्ध ठेवावें. |
| ६ संयम................ | मन स्वाधीन ठेवावें. |
| ७ तप .... ............ | सामाइक त्रिकाळ ईश्वराचें ध्यान करावें. |
| ८ त्याग .... .... .... | दुर्व्यसनावर अप्रीति ठेवावी. |
| ९ आकिंचनत्व .... .... | वस्तूवर लोभ न धरितां दातृत्व असणें. |
| १० ब्रह्मचर्य ........... | स्त्रीस न वरणें (मुनीचें) स्वस्त्रीवांचून इतर स्त्रियांचा अभिलाष न करणें (श्रावकाचें) |

वर सांगितलेलीं लक्षणें जो पाळितो तो धर्मपाळक व जो पाळीत नाहीं तो धर्मनाशक असें केवलीचें मत आहे.

केवलीच्या मताप्रमाणें जे ईश्वरास भजतात व ज्यांची काया, वाचा, मन, हीं सर्वदा शुचिर्भूत असतात तेच भक्त व तेच खरे मनुष्यजन्मास आले व त्यांनींच मातेच्या उदरांत जन्म घेतल्याचें सार्थक केलें ह्यांत संशय नाहीं.

ईश्वरस्वरूप जाणण्याचे आणि त्याचें ध्यान करण्याचे पांच प्रकार आमच्या जिन शास्त्रांत वर्णिले आहेत. ते असे कीं, मतिज्ञान, श्रुतिज्ञान, अवधिज्ञान, मनपर्याय. हे प्राप्त झाल्यानें शेवटीं केवल ज्ञान प्राप्त होतें; तेणेंकरून भूत भाविष्यादि सर्व कळूं लागतात. ह्म० आपण पूर्वीं कोण होतों, काय काय कृत्यें केलीं व त्यांपासून कोणतीं सुखदु:खें प्राप्त झालीं, जन्मास येऊन काय केलें पाहिजे होतें, आतां येथून पुढें काय करणार, चौऱ्याशींच्या तडाक्यांतून पार पडण्यास काय केलें पाहिजे, इत्यादि अगोचर गोष्टी दृग्गोचर होतात; व कर्माकर्माचा समूळ नाश होऊन पुण्यप्राण्याच्या पंचजोती अर्हतरूपीं मिळून जातात.

ह्यावरून अर्हत् व जीव एकच होत. फक्त जीवास कर्मानें बांधून टाकिलें आहे. 'जसें कर्म करावें तसें भोगावें' ह्मणून जन्ममरणाच्या तडाक्यांत कर्मामुळें राहणें भाग पडतें.

आतां आपण कोणत्या देवास भजलें पाहिजे हें स्वजातबंधूंस स-

मजलें पाहिजे. कारण फार दिवसांपासून हिंसाधर्माच्या संगतीनें आपले लोक बिघडून अज्ञानांजन नेत्रांत घालून ईश्वर रूपास विसरून गेले आहेत. इतकेंच नव्हे पर्वतप्राय ज्या गोष्टी नेत्रांपुढें ढळढळीत दिसतात तिकडे सुद्धां क्षणैक दृष्टी देत नाहींत. याचें विचारपूर्वक मनन केलें असतां असें वाटतें कीं, बौद्ध यवनादिकांच्या क्रूरपणाच्या व जात्यभिमानप्रतिबंधाच्या योगानें व शंकराचार्यांच्या विजयकीर्तीनें मोडकळीस आला. तशांत एखादा प्रसिद्धि करूं लागला तर त्यास तत्काल विनाकारण देहांत शिक्षा व्हावयाची. व धर्मही भ्रष्ट करण्याची दहशत. मग घटकाभर राज्याधिकारामुळें पैगंबरभक्त बनले तर धडगत. अशा समयांत अगदींच चुराडा उडावयाचा परंतु मूळ तरी राहिलें हेंच मोठें भाग्य होय.

वरील प्रकार प्रतिबंधत्वामुळें अडून राहिला. पण अलीकडे ५० वर्षांत तर अशी कांहीं धास्ती उरली नाहींना? पण 'परकीया प्रिया' हेंच जिकडे तिकडे फोकावल्यामुळें घरच्या पतिव्रतेचा त्याग करून कुलटा प्रिय वाटूं लागल्या त्यास काय उपाय? स्वधर्मावर भक्ति ह्या कलींत बसणार नाहींच. कारण केवलीचें भविष्य खोटें कसें होईल? "कलियुगांत असत्य वाढेल, सत्य आवडणार नाहीं, जिनधर्माचा ऱ्हास होईल, सर्व पृथ्वी म्लेच्छमय होईल, सर्व पृथ्वी रसातळास जाईल, धर्माचें महत्व कमी होईल, स्त्रिया दुराचारी निपजतील—इ०" यावरून जिनधर्माचें महत्व कमी झालें, हें एक भाकित तर प्रत्ययास येऊन चुकलें असो. तथापि येथून तरी कांहीं सुधारणा होईल ही आशा आहे.

आतां कोणी असें ह्मणतील कीं, पृथ्वीवरील सर्व धर्म खोटे, आणि एक जिनधर्मच खरा भासवून मिशनरी लोकांप्रमाणें धर्मस्वीकारार्थ उपदेश करीत आहें. तर त्यांस असें सांगणें आहे कीं; सर्व गांवची उठाठेव करण्याची कोणासही जरूर नसते. फक्त स्वगृहांतील झालेली अव्यवस्था दूर होऊन कांहीं शिस्त लागावी; ह्मणून जातिबंधु हेंच मा-

---

१ औरंजेबाच्या व शेवटच्या बाजीराव पेशव्याच्या कारकीर्दीत केवढें धर्मबंड! पुण्याचें वर्णन निबंध पहा.

शें कुटुंब आहे. तें सद्धर्मानें वागावें हाच मुख्यार्थ जाणावा. ह्मणून मी खऱ्या जिनाचें स्वरूप सांगत आहें.

परमेश्वरास अठरा दोष नाहींत ते हे—

श्लोक.

क्षुधा, तृषा, जनन, विस्मय, राग, मोहम्, ॥
चिंता, विषाद, मद, खेद, जरा, रुजीता ॥
प्रस्वेद, मृत्युरपि रोष, भयं च, निद्रा ॥
तस्यादिदोष रहितो महितो जिनेंद्रः ॥

भूक, तहान, रोग, द्वेष, इत्यादि अठरा दोष रहित जो देव तोच जिनेंद्र जाणावा. अशा प्रभूचे ठिकाणीं भक्ति धरून मुक्तीस वश न करितां इतर कलोबा, ह्मसोबा, इ० देवांस विनाकारण भजतात, हिंसा करितात. येणेंकरून खरें रूप दिसून परमानंद तर मिळणार नाहींच परंतु नर्काचें मात्र चांगलें साधन करितात; अशी केवली साक्ष देतात.

आतां अर्हत् प्रभु निराकार निर्गुण असतां स्थान व गुण यांच्या योगानें मुनींनीं १२ गुण कल्पिले आहेत. ते अष्टमाहाप्राप्त्यर्ह्य व चार अनंत ते—

श्लोक.

अशोक वृक्षस्सुरपुष्पवृष्टि । दिव्य ध्वनी श्चामरमासनं च ॥
भा मंडलं दुंदुभिरातपत्रं । संप्राप्ति हार्याणि जिनेश्वराणां ॥

हे गुण केवलज्ञान जाहल्यावांचून कळावयाचे नाहींत. ज्याला प्रवासाचें नांव काढल्याबरोबर कपाळास शेंकडों आंठ्या पडतात, अशा मनुष्यांस दूरांतराच्या एकाद्या शहराचें वर्णन सांगितलें असतां तें जसें त्यांस प्रिय वाटत नाहीं; त्याप्रमाणेंच केवलज्ञानावांचून पोकळ ब्रह्मज्ञानाच्या भपकीवाल्याकडून गुणज्ञान व्हावयाचें नाहीं.

असो. भगवंतास चार अनंत आहेत ते—

अनंत ज्ञान .... ....ज्याचें ज्ञान मानवाच्या ज्ञानशक्तीस अगोचर.
अनंत दर्शन.... ........सर्व जग ज्याला दृश्य असा.
अनंत वीर्य .... ........सर्वशक्तिमान.
अनंत सुख .... ........केवल सुखसमुद्र.

असा सर्वज्ञ सर्व शक्तिमान परमेश्वरच होय. पूर्ण बुद्धि व सर्वज्ञता हीं ईश्वराच्या ठिकाणीं मात्र आहेत; तीं कदापि इतरांस प्राप्त व्हावयाचीं नाहींत. ईश्वर सर्वज्ञ व सर्व गुणांनीं परिपूर्ण आहे, ह्याविषयीं सर्व धर्मांचीं मतें आहेत.

आणखी असें आहे कीं, अर्हत् व सिद्ध एकच आहेत, अशी त्यांची गुणावरून समता कल्पिली आहे. ती अशी. भगवंतरूप हें सौख्यमय व सिद्धरूप हें ज्योतीमय, असेंच पंचपरमेष्टीविषयीं वाक्य आहे.

कोमलंकदलीपत्रं
पंचपरमेष्टिवर्णानां भावनं भवनाशनं ॥

भावार्थ—कोमल कर्दळी पत्राप्रमाणें किंवा शुद्ध स्फटिकासमान बालभानूसारखी किंवा सुवर्णासारखी ज्याची कांति आहे, अशा भगवंताची भावना केल्यानें संसारसागर तरून तो जीव सौख्यास पात्र होतो.

सिद्धाचें रूप असें सांगितलें आहे कीं.—

अकाररहितं शुद्धं स्वरूपं च व्यवस्थितं ॥
सिद्धअष्टगुणोपेतं निर्विकारं निरंजनं ॥

भावार्थ—अकाररहित शुद्धस्वरूप असा आठ गुणांनीं युक्त जो सिद्ध तो विकाररहित आणि निरंजन आहे. ते गुण असे. गाथा—

सम्मतणाण दसण वीर्येसुहमत्तयेव अवगहणं ॥
अगसलघुमव्वाहं आठ गुणाव्हंति सिद्धाणं ॥

भावार्थ—सम्यक् ज्ञानी व सम्यक् दर्शनी, सर्वशक्तिमान, सुखी व अवग्रहण करणारा, इ० गुणांनीं जो युक्त सिद्धरूपी भगवान् त्याचें ध्यान यतींनीं केल्यास असें रूप दृष्टीस पडतें.

तत्सदृशं निजात्मानं यो जानाति स पंडितः ॥
सहजानंदचैतन्यं प्रकाशाय महीयशो ॥

यावत्रूप दृग्गोचर होऊन तद्रूपीं (ब्रह्मरूपीं) ही मिळतो.

ध्यान करण्याविषयीं असें सांगितलें आहे.

पदस्थं मंत्रवाक्यस्थं पिंडस्थं स्वात्मचिंतनं ॥
रूपस्थं सर्वचिद्रूपं रूपातीतं निरंजनं ॥

भावार्थ—रूपांत अगदीं तल्लीन झालें असतां सर्व विषयांची विस्मृति होऊन अर्हत्रूप अगदीं मनांत भरतें. असा योग जैनधर्मांतच घडतो असें नाहीं. तर दुसऱ्या अनेक धर्मांतही लोकांस प्राप्त होतो. परंतु शुद्ध भावना मात्र पाहिजे.

जसें राजादिकांची भेटी होण्यास मंत्र्यादि योग्य अवश्य असले पाहिजेत, तद्वत् ईशप्राप्तीला सद्गुरू अवश्य पाहिजे. आतां तो गुरु कसा असावा, ह्याविषयीं सूक्तमुक्तावलींत सांगितलें आहे.

पिता माता भ्राता प्रियसहचरी सूनु निवहा ॥
सुहृत्सामिन्माद्यात्करिभटरथास्वःपरिकरः ॥
निमज्जंतुंज्जतुं नरक कुहरी रक्षितुमलं ॥
गुरो धर्माधर्म प्रकटन परात्कोपि नयपरः ॥

अशीच दुसरी उक्ति.

दूध पियो सो सिद्ध भयो ओ क्यां बालक बचिया ॥
स्नान करि सो सिद्ध भयो ओ क्यां मेंडुक मच्छिया ॥
गाय नाच सो सिद्ध भयो ओ क्यां कलवात् कथिया ॥
स्त्री त्याग करि सो सिद्ध भयो ओ क्यां खोज्या खचिया ॥
कहते माधव सुनले उद्धव एक गुरुनामच किया ॥
गुरुविण चारी बाता कचिया ॥

यावरून गुरु अवश्य केला पाहिजे. पण गुरु असूनही ज्ञान होत नाहीं, असा एखादा मनुष्य असला तर तो मनुष्यरूपी पशूच समजला पाहिजे. असो. गुरु असूनही स्वाभाविक गुण अंगांत असला पाहिजे. एरव्हीं परीस लोहास सुवर्ण करितें ह्मणून काय पाषाणास करील? पुढील कर्मास अंगस्वभाव मुख्य असला पाहिजे.—

"रागी बागी नाडी पारखी और न्याव ॥
ये पंचनकू गुरु हाय पर उपजत अंगस्वभाव" ॥

गाणारा, माळी, वैद्य, आणि न्यायाधीश यांस गुरु असतांही अंगस्वभाव पाहिजेच.

गुरवो बहवाःसंति शिष्यवित्ताप हारकाः ॥
गुरवो विरलास्संति शिष्यहृत्ताप हारकाः ॥

असा गुरु पाहिजे कीं जो प्रापंचिक सर्व संताप दूर करून साक्षात् ब्रह्मस्वरूप दुसऱ्यास दाखविणारा. मग आपण तरून दुसऱ्यासही कां न तारील ?

वर सांगितल्याप्रमाणें दशलक्षणयुक्त धर्म, अर्हत्सारखा प्रभु, निर्ग्रंथासारखा गुरु एवढीच कायती सामुग्री जैन धर्मांत आहे. तुकोबा, ज्ञानोबा, यांसारखे यांच्यांत साधु कोठें आहेत? असा संशय कोणी घेतील तर त्यांस इतकेंच सांगणें बस आहे कीं, जैन धर्मांत जे अर्हताचे रूपीं मिळून केवळ सिद्ध होऊन जगास ( स्वजातीच्या लोकांस ) पूज्य झाले आहेत व दशधर्मांचा अंगिकार करून, दर्शन, ज्ञान, चारित्र, यांहींकरून मुक्तिसुखास पात्र झाले आहेत त्यांस तीर्थंकर ह्मणतात. तीर्थंकर ह्मणजे अर्हतरूपास मिळालेले ब्रह्मरूपी जीव होत. यास्तव त्यांच्या नांवाचा विसर न पडावा, व त्यांच्यासारखी भक्ति सर्व जीवांनीं करावी, तद्वत् द्वेषभावही न व्हावा, ह्मणून जैन लोकांच्या भरभराटीच्या काळीं तीर्थंकराच्या हजारों ठिकाणीं चैतालयें बांधून स्थापना केल्या. त्याप्रमाणेंच जैनांची सद्दी असती तर अशी शंकाच न निघती. तथापि बुद्ध, ब्राह्मण, यवन यांच्या झपाट्यांतून वांचून जिनधर्मी लोकांच्या स्वाधीनही पुष्कळच आहेत. त्यांत अजमिराजवळ रुखमनाथाचें देवालय, उज्जयंती गिरीवर नेमिनाथाचीं चैतालयें, चंपापूर ( वासु पूज्य ) सारंगपूर, नागपूर, धारासिंह ( वर्धमान ), बेळगुड ( घुमट स्वामी ), निपाणीजवळ तवनिधि ( ब्रह्म ), वगैरे हजारों मनोरम पवित्र प्राचीन इमारती आहेत. व अलीकडे पुणें, मुंबई, कलकत्ता, काशी, मिर्झापूर, सोलापूर, नातेंपोतें, दहिवडी, वगैरे स्थळीं उत्तम चैतालयें मनोहर बांधिलीं आहेत.

प्रकृत धर्मात तीर्थंकरासारखे महासाधु, दशलक्षणयुक्त धर्म, अर्हतासारखा परमेश्वर, एवढा जबरदस्त खटला असून जिनधर्माभिमानी जैन लोक स्वधर्मावर गैरमर्जी करून अन्य मतांचा स्वीकार करितात

हें त्यांस व त्यांचे धर्मास व तत्पूर्वजांस आणि धर्मउत्पादकांस लांछन नव्हे काय ?

अशांबद्दल त्यांस तरी दोष देणें सर्वांशीं योग्यसें दिसत नाहीं. क्रूर, धर्मवेडे, अधर्मप्रवर्तक, स्वधर्मवृद्धिकर्ते राजेच जर झाले नसते तर अशी दशा कां येती? असो. जों पर्यंत कायदा, जबरी होती; त्यावेळेस ( यथा राजा तथा प्रजा ) झालें तें झालें. परंतु आतां तरी परम दयाळू एम्प्रेस ऑफ् इंडियाचे राज्यांत तसा प्रकार नाहीं, ह्या भाग्योदयाचे सद्दींत तरी हद्दी सोडूं नये, एवढेंच सांगून हें सांगणें आटपतों.

आतां ह्या धर्माचे अभिमानाच्या, अज्ञानाच्या, कोठें द्वेषभावाच्या योगानें दिगांबरी, श्वेतांबरी, तेरापंथी, धोंडपंथी, वगैरे भेद व त्यांचे पोटभेद अनेक आहेत, तथापि सर्वांत ' अहिंसत्व ' आहेच. ह्यास्तव कोणी कोणत्याही कां होईना पण स्वधर्मानें वागावें ह्मणजे त्यांत हित आहे.

## ग्रंथकर्त्याची प्रार्थना श्लोक.

शा० वि०

स्वस्तिश्री जिनसेन[1] राजगुरुजी स्वामी वसे नांदणीं ॥
योगाभ्यास करूनि तुष्टवि जना बोधामृता पाजुनी ॥
तारूनी सकळां भवांबुधिंतुनी केली सुकीर्ती जनीं ॥
यांचे पादसरोज नित्य नमुनी हा ग्रंथ केला म्हणी ॥ १ ॥
अप्पाख्या[2] स्वपिता जिजा सुजननी बच्चाँ[3] असे मावळा ॥
नागेशाख्यहि इष्ट सुष्ट बरवा कल्लाख्यही[4] लाभला ॥
यांच्या पूर्ण कृपेकरूनि रचिला हा ग्रंथ मीं सज्जना ॥
प्रेमें दोषहि त्यागुनी गुणकणा घ्याजी करीं प्रार्थना ॥ २ ॥

---

१ आमचे स्वामी भट्टारक पट्टाचार्य जिनसेन. (नांदणी) लक्ष्मीसेन कोल्हापूर यास नमस्कारून. २ अप्पा चंदापा वाडकर (जनक) ३ नांवाचा आधारदायक. ४ कल्लाप्पा अणा अष्टेकर वकील सं० कुरुंदवाड.

## 'श्रीपालचरित्र' ग्रंथास उदार आश्रयदात्यांची नांवगांववार यादी.

| नांवें. | प्रती. |
|---|---|
| **आष्टें व कुरुंदवाड.** | |
| रा० रा०— | |
| कल्लाप्पा अण्णासाहेब आष्टेकर. वकील-सं. कुरुंदवाड. .... | ५०० |
| **कागल.** | |
| श्री. शांतिसागर लक्ष्मीपति..... | २०० |
| **सोलापूर.** | |
| हरी कस्तूरचंद शेट. .... .... | ८० |
| रावजी कस्तूरचंद शेट. ........ | १ |
| **बारामती.** | |
| केवळचंद परमचंद कोठारी.... | १ |
| तात्या उपाध्ये. .... .... .... | १ |
| **कल्याण.** | |
| सखाराम निलकंठ पटवर्धन..... | १ |
| **अगाशी.** | |
| नारायण पुरुषोत्तम अळवणी पोस्टमास्तर. .... .... .... | १ |
| विनायक दाजी बेहेरे हेडक्लार्क बेळगांव एज्यु० दक्षि० .... | १ |
| **भोसें.** | |
| नाना पाटील. .... .... .... | १ |
| अदगौंडा पाटील. ........... | १ |
| रामगौंडा पाटील. .... .... .... | १ |
| दादा पदगौंडा पाटील..... .... | १ |
| बाबाजी अण्णा पाटील. ........ | १ |
| भाऊ पाटील. .... .... .... | १ |
| **बेळगांव.** | |
| संगाप्पा मल्लाप्पा मास्तर. .... | १ |
| नागाप्पा मल्लाप्पा बुकसेलर .... | १ |
| पदमय्या यशोधर पंडित. ..... | १ |

| नांवें. | प्रती. |
|---|---|
| **दुधगांव.** | |
| रा० रा०— | |
| कृष्णाजी हरी चिटनीस स्कू. मा. | १ |
| मोरोपंत फडके अ. मास्तर .... | १ |
| विठ्ठल लक्ष्मण देशपांड्ये. .... | १ |
| गोपाळ जयराम राजवाडे. .... | १ |
| बळवंत ,, ,, ... | १ |
| रामचंद्र ,, ,, ... | १ |
| पांडुरंग आबाजी कुळकर्णी. .... | १ |
| रामचंद्र गोपाळ करणी......... | १ |
| प्रभाकर गोविंद लिमये......... | १ |
| **आष्टें.** | |
| महंमदभाई बेलीफ. .... .... | १ |
| अण्णा गंगु फाळके पाटील पाडळी | १ |
| **दुधगांव.** | |
| खंडू हरी दरेकर. .... .... | १ |
| भाऊ जिनाप्पा मलाडे. .... .... | १ |
| अमृता यशवंता अडमोटे. .... | १ |
| बाबगौंडा समगौंडा पाटील. .... | १ |
| मोहिदिन व. सैदू तांबोळी. .... | १ |
| नानाचंद खेमचंद गुजर. .... | १ |
| दादा शिवगौंडा पाटील. .... | १ |
| तात्या अण्णा कुदळे. .... .... | १ |
| शामा शांता उपाध्ये. .... .... | १ |
| बाबाजी कल्लाप्पा अष्टेकर. .... | १ |
| दादा जिनाप्पा आष्टे. .... .... | १ |
| बाबाजी दांड बागणी. .... .... | १ |
| नरसिंगा तमाणा चौगुला. .... | १ |
| अप्पा काळाप्पा शेटे कोल्हापूर | १ |
| भाऊ भरमाणा नाईक टोप. .... | १ |
| दादा वडुतरे कोल्हापूर. ....... | १ |

| नांवें. | प्रती. |
|---|---|
| रा० रा०— | |
| पायापा उपाध्ये. सांगली. .... | १ |
| अण्णा पाटील. ,, .... | १ |
| भरमगौंडा दरगौंडा भोजकर.... | १ |
| **पुणें.** | |
| विष्णु रघुनाथ गोवईकर. .... | १ |
| अनंत आत्माराम. .... .... | १ |
| गंगाराम राघोबा जंगले. .... | १ |
| विनायक आत्माराम वर्धमाने. | १ |
| देविंद्रा पदमाणा वर्धमाने. .... | १५ |
| **नांद्रें.** | |
| अंणा लगमू पाटील. .... .... | १ |
| पदीशा पाचणे. .... .... .... | १ |
| नेमगौंडा समडोळीकर. .... | १ |
| बाबाजी नेमाणा बागणे. .... | १ |
| शांता जिनाप्पा सावळबाडे. .... | १ |
| सातागौंडा भुजाप्पा नरदेकर.... | १ |
| देविंद्रा बाबाजी देशीकर. .... | १ |
| पिरगौंडा बाबाजी पाटील. .... | १ |
| दादा नाना उपाध्ये. .... .... | १ |
| गुंडाप्पा चौगुला. .... .... | १ |
| नाना कळंत्रे. .... .... .... | १ |
| **कामेरी.** | |
| हरी बाहिरव कुळकर्णी. ........ | १ |
| जिनोबा औटी. .... .... .... | १ |
| दत्तो व्यंकटेश अ. मा. .... | १ |

| नांवें. | प्रती. |
|---|---|
| **इस्लामपूर.** | |
| रा० रा०— | |
| पायापा अणा रोठे. .... .... | १ |
| अंणा नेमाणा रोठे. .... .... | १ |
| अणा पाटील वसगडे. .... | १ |
| बाबाजी पाटील ,, .... ... | १ |
| थइगौंडा पाचवडे. नांद्रेकर. .... | १ |
| भुजबळी चौगुला–भिलवडी..... | १ |
| नरहर भिमाजी कुळकर्णी येड. | १ |
| माऊ नेमाणा बिंदगे येडेनिपाणी. | १ |
| नेमाणा अपा कुबेर. .... .... | १ |
| आळापा अणा चौधरी. .... | १ |
| **कुपवाड.** | |
| बाळा चिटको उपाध्ये स्कू. मा. | १ |
| पायगौंडा पाटील. .... ... | १ |
| अदगौंडा पाटील. .... .... | १ |
| दादा भुजबळी पाटील. .... | १ |
| अणा उपाध्ये. .... .... .... | १ |
| पिरगौंडा पाटील. .... .... | १ |
| **समडोली.** | |
| बाबगौंडा पायगौंडा पाटील..... | १ |
| कलगौंडा दरगौंडा स्कू. मास्तर. | १ |
| पायगौंडा भिलवडीकर अ. मा. | १ |
| जिनगौंडा अदगौंडा पाटील..... | १ |
| अपा जिनापा बेले. .... .... | १ |
| दादा अदापा चिमाणा. .... | १ |
| वालचंद बेचरचंद गुजर. .... | १ |

आणखी पुष्कळ आश्रयदाते आहेत, परंतु विस्तारास्तव इतकेच पुरे केले.